कल्पनेचें रूप । जगीं न दाखवी ईश्वरत्वप्रताप । अवतारीं दाखवी. ॥ १२७ ॥ राजद्रव्य भांडारीं । रत्नांकित मंदिरीं । तेंचि जनासी देतां दारोदारीं । फिरे परि तेंचि तें. ॥ १२८ ॥ ऐसें ज्ञान तें विज्ञान । प्रत्यक्ष मायामयही चित्स्वरूप हें ज्ञान । या विज्ञानयुक्त ज्ञानें अनुसंधान । राहे प्रत्यक्षही हें भगवंतचि म्हणोनी. ॥ १२९ ॥ दृष्टि न पडे कारणीं । तरी जडत्व वाटे कार्यपणीं । या अन्वयज्ञाना-वांचुनी । त्रिगुणीं काय भगवद्भाव वाटेल? ॥ १३० ॥ म्हणोनि मुख्य पाहिजे ज्ञान । परि माया त्याज्यांश वाटे जडत्वभान । त्यांत सगुणत्व पाहणें हें विज्ञान । मेळवितां प्रत्यक्ष भगवद्रूप वाटे. ॥ १३१ ॥ ऐसें ज्ञान विज्ञानसहित । तेव्हां प्रत्यक्षावगम निश्चित । कीं प्रत्यक्ष दिसतें हेंही भगवंत । कल्पूनि आपणा आपण दावितो. ॥ १३२ ॥ उभा राहोनि निरंतर । स्तंभरूप दावी, शरीर । पुरुषचि तो स्तंभाकार । तें शरीर कल्पना तयाची ॥ १३३ ॥ तथापि ते माया । त्याज्य वाटे धनंजया । कीं सुवर्णाचिया क्रयविक्रया । चाड अलंकाराची असेना ॥ १३४ ॥ परि सुवर्णें सधन अलंकारें सुंदर । दोनी अपेक्षिती जे चतुर । ते आयत्या नगीं परम तत्पर । त्याज्यांश त्याला दिसेना. ॥ १३५ ॥ आतां वेगळी कैंची माया । जड भास कैंचा धनंजया? । पाहे आतां जगास या । योग ऐश्वर रूप ऐसें पुढें बोलेल. ॥ १३६ ॥ म्हणोनि हें प्रत्यक्ष जें स्थावरजंगम । स्वयें मीच साकार पुरुषोत्तम । ऐसें ज्ञान तें प्रत्यक्षावगम । यास राजविद्याराज-गुह्य मी म्हणतों. ॥ १३७ ॥ जें प्रत्यक्ष तेंचि अवगम । या भावें म्हणे प्रत्य-क्षावगम । दुसरा अर्थ याचा प्रत्यक्षीं अवगम । मिथ्या संपत्ति अवगम जैसा रज्जूचा. ॥ १३८ ॥ जड सर्प निषेधितां असत्य । कळे चित्स्वरूप रज्जु सत्य । हा अर्थ टाकोनि काय अगत्य । कीं तो अर्थ अंगीकारावा? ॥ १३९ ॥ ऐसे कोणी म्हणती । हें सर्वज्ञ जाणे जगत्पती । यालागीं खूण सांगे अर्जुनाप्रती । कीं हें धर्म्य म्हणोनी.॥१४०॥ कीं जडसर्प निषेध घडे । चित्स्वरूप रज्जू ठायीं पडे । तैसा प्रत्यक्षीं अवगम सांपडे । प्रत्यक्ष निषेधितां निर्गुण रज्जूचा.॥१४१॥ तें नैर्धर्म्य म्हणावें ज्ञान । कीं निर्धर्मी लागे अनुसंधान । या ज्ञानांत मिसळितां विज्ञान । हें सगुणज्ञान धर्म्य ऐसें म्हणावें. ॥ १४२ ॥ प्रत्यक्ष नाना धर्मरूप । अवगम त्याचा कीं तें भगवत्स्वरूप । नव्हे निर्धर्म निर्गुण अरूप । या प्रत्यक्षासारिखें. ॥ १४३ ॥ जेथें कांहीं तरी गुण । तेथें लागतें धर्मपण । के-वळ गुणातीत निर्गुण । निर्धर्म त्यातें म्हणावें. ॥ १४४ ॥ जेथें माया तेथें

१. ईश्वरपण. २. ज्ञान.

धर्म । मायेपरतें तेंचि निर्धर्म । विश्व आणि ईश्वर दोनी सधर्म । हें ज्ञान धर्म्य यालागीं. ॥ १४५ ॥ आतां पुण्यजनक कर्म । त्यासही म्हणावें धर्म । तरी ज्ञान नैष्कर्म्य हें वर्म । कर्मातीतास धर्म लागेना. ॥ १४६ ॥ कर्म लागलें अविवेकडे । ज्ञानियास त्या अविवेच्या संस्कारें घडे । कीं प्रारब्धही अविवेंत पडे । फळ अविचारचित कर्मांचें. ॥ १४७ ॥ पुण्य आणि पाप । दोनीही अविद्यारूप । कर्मधर्मदाहकस्वरूप । ज्ञानाग्नि हा. ॥ १४८ ॥ धर्म म्हणतां पुण्यकर्म । ज्ञानीं न लगे तो धर्म । या धर्म्य पदाचें न कळोनि वर्म । प्राकृत टीकाकार धर्म्य इतकेंचि बोलती. ॥ १४९ ॥ आतां आत्मा पहावा हाचि परम । याज्ञवल्क्य बोलिला धर्म । तरी तें स्मृतींत बोलतां कर्म । पुरुषार्थ धर्म शब्दें उपपादिती. ॥ १५० ॥ तरी कर्ममार्गी जो पुरुषार्थ । तो मुख्य पुरुषार्थ न म्हणावा हा अर्थ । कीं पुरुषार्थ थोर,तोचि यथार्थ । जेथें योगें घडे आत्मदर्शन. ॥ १५१ ॥

याज्ञवल्क्यस्मृति—**इज्याचारदमाहिंसादानस्वाध्यायकर्मणाम् ।**
अयं तु परमो धर्मो यद्योगेनात्मदर्शनम् ॥

स्मृत्यर्थ—इज्या यज्ञ आणि देवतापूजन । आचार स्वधर्म शौच सोवळें स्नान । दम इंद्रियदमन । परपीडा टाकणें अहिंसा. ॥ १५२ ॥ सत्पात्रीं देणें हें दान.। स्वाध्याय वेदशास्त्राध्ययन । कर्में इत्यादि आचरती जन । धर्म म्हणावे हे सर्व. ॥ १५३ ॥ परंतु योगें करोनी । आत्मदर्शन साधिती मुनी । परम धर्म तो हा म्हणोनी । परम पुरुषार्थ सूचवी. ॥ १५४ ॥ कर्मशास्त्ररूपा स्मृती । आचार व्यवहार प्रायश्चित्तें सांगती । तेथें धर्म पुरुषार्थ बोलती । प्रसंगें म्हणे मुख्य पुरुषार्थ आत्मज्ञान. ॥ १५५ ॥ हे ज्ञानशास्त्र गीता । येथें ज्ञान नैष्कर्म्य हेंचि तत्त्वतां । नैष्कर्म्य नैष्कर्म्य म्हणोन बोलता । जाला बहुतां स्थळीं. ॥ १५६ ॥

गीतावचन—**न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।**
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥

ऐसें नैष्कर्म्यशब्दें करोनी । ज्ञान कर्मातीत म्हणोनी । स्वयें सर्वत्र बोलोनी । ज्ञानास धर्म्य कां तो म्हणेल? ॥ १५७ ॥ एवं प्रत्यक्ष विश्व हें भासतें । ज्या ज्ञानें सगुणरूपचि दिसतें । प्रत्यक्षावगम त्यास म्हणिजेतें । धर्म्य-म्हणावें या लागीं. ॥ १५८ ॥ ऐसें विज्ञानसहित ज्ञान । ज्ञानियास हेंचि सगुणभजन । द्वादशीं धर्म्यामृत म्हणोनी जगजीवन । सगुणभक्त

वर्णोनि बोलेल. ॥ १५९ ॥ अष्टादशीं शेवटीं । **गी**ता सगुणपर हा भाव पोटीं। मुखें म्हणेल अगा **किरीटी!** । संवाद माझा तुझा हा धर्म्य. ॥१६०॥ **'अध्ये-ष्यते च य इमं'** या श्लोकेंकरोनी । **'धर्म्यं संवादमावयोः'** म्हणोनी.। विश्व सगुणब्रह्म हें ज्ञान यावरूनी । धर्म्य म्हणावें या स्थळीं. ॥ १६१ ॥ सगुणभक्त ऐसे ज्ञानी । **अर्जुना**! हा भाव हृदयीं धरोनी । **'एवं सततयुक्ता ये'** या श्लोकें करोनी । हे थोर कीं ते थोर द्वादशीं पुसेल. ॥ १६२ ॥ या प्रसंगाचेंचि उद्घाटण[1] । तेथें करोनि **जगज्जीवन** । अंतीं हें धर्म्यामृत म्हणोनि वचन । द्वादशीं या भावेंचि बोलेल. ॥ १६३ ॥ निर्गुणज्ञानाचा मुकुट । हें सगुण ज्ञान उत्कट । त्याज्यांश जेथें नुरे निपट । **रामकृष्णरूपें** तैसें चराचर पाहतां. ॥ १६४ ॥ समुद्रांत उठला कल्लोळ । त्या कल्लोळीं समुद्राचेंचि जल । जो त्याचा आकार त्याचेंही मूळ । कैंचें सागरावेगळें. ॥ १६५ ॥ तरंगां प्रकाशी सागर । ब्रह्म प्रकाशी चराचर । माया जे चराचराकार । ब्रह्मचि मूळ तीचेंही. ॥१६६॥ बीज आणि अंकुर। दोनी मिळोनि जाला तरुवर। तैसें ब्रह्ममाया मिळोन चराचर । प्रत्यक्ष **भगवद्रूप** हें. ॥ १६७ ॥ बीजा अंकुरा वेगळेपण । तेंवी वेगळी माया आणि निर्गुण । दोनी पृथक् आणि एकपण । प्रत्यक्ष **भग**-वद्रूप हें. ॥ १६८ ॥ ऐसें जें कां अत्यंत । **भ**गवद्भक्तिरूप अद्वैत । धर्म्यपदें **भ**गवंत । उपपादितो. ॥ १६९ ॥ धर्म्य नांव या ज्ञानाचें । महत्त्व सर्वांहून यांचें । या अध्यायमुखें वर्णी साचें । अन्यत्र ऐसी प्रशंसा करीना. ॥ १७० ॥ **गी**तेंत हेंच ज्ञान थोर । हेचि भक्ति वर्णी सादर । म्हणोनि अष्टादशीं **स**र्वेश्वर। अवघाच धर्म्यसंवाद हा म्हणे. ॥ १७१ ॥ **गी**तेंत आहे कर्मकांड । तेथें धर्मही बोलिला उदंड । परि प्रतिअध्यायांतीं अखंड । **'उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे'** च म्हणतसे. ॥ १७२ ॥ घरीं कुणबी आणि कुणबिणी । परि ब्राह्मण घरचा धनी । तें ब्राह्मणगृह ऐसीच वाणी । सर्वांची निघतसे. ॥ १७३ ॥ तैसें **गी**तेंत सकळ । परि अध्यात्म आद्यंत पुष्कळ । त्यांत ब्रह्म बोलोनिही निष्कळ[2] । अतिशय महिमा याच सगुणज्ञानाचा. ॥ १७४ ॥ आतां धर्म्यपदाचा निर्णय । बहुत बोलोनि काय? । निर्गुण तों बोलिलें न जाय । ज्ञान धर्म्यपदेंकरूनी. ॥ १७५ ॥ एक सगुणज्ञानेंच घडे । कीं लागे पुण्यकर्माकडे । तरी कर्मप्रशंसा न सांपडे । या प्रकरणीं सर्वथा. ॥ १७६ ॥ आणि ज्या **अर्जुना**प्रती । हें ज्ञान बोलतो **श्री**पती । तो विश्वरूपीं प्रथमश्लोकीं वि-

---

१. स्पष्टीकरण. २. सर्व.

नंती । काय करितो? ॥ १७७ ॥ कीं माझ्या अनुग्रहाकारणें अत्यंत । गुह्य अध्यात्मसंज्ञित । जें बोलिलासि तूं भगवंत । त्याणें गेला माझा मोह हा. ॥ १७८ ॥ येथें धर्माची कां कथा । धर्म्यपदें निर्गुणही नव्हे सर्वथा । सगुणज्ञानावांचोनि अन्यथा । न लागे हें धर्म्यपद. ॥ १७९ ॥ आतां या श्लोकीं कमलनेत्र । म्हणतो हें उत्तम पवित्र । तरी पवित्र पदार्थ मात्र । ज्ञानासारिखा असेना. ॥ १८० ॥ **'नहि ज्ञानेन सदृशं'** या श्लोकें करोनी । ज्ञानासारिखें पवित्र नाहीं म्हणोनी । मागें श्रीकृष्ण बोलिला यावरूनी । पवित्र शब्दें सोंवळें जें नातळे द्वैतातें. ॥ १८१ ॥ पवित्र उगेंचि ज्ञान निर्धर्म । आणि हें पवित्र म्हणे उत्तम । कीं माया म्हणावें स्थावर जंगम । हेंही जेथें असेना. ॥ १८२ ॥ हे राजविद्या राजगुह्य परम । हें पवित्र उत्तम । हें ज्ञान प्रत्यक्षावगम । आणि धर्म्य यालागीं. ॥ १८३ ॥ ऐसें श्रेष्ठत्व याचें तीं चरणीं । आयकोनि अर्जुन अंतःकरणीं । भ्याला कीं षष्ठीं योगप्रकरणीं । मनोनिग्रह कठीण वाटला. ॥ १८४ ॥ तें मी बोलिलों याप्रती । तेथें वैराग्य अभ्यास हा जगत्पती । उपाय सांगोनि म्हणे मागुती । कीं योग मनोनिग्रहावांचूनि असाध्य. ॥ १८५ ॥ त्या सकळां योगाहूनि । हें ज्ञान थोर म्हणोनि । मज म्हणतो यावरोनी । साधन याचें कठीण असेल. ॥ १८६ ॥ अर्जुन ऐसा शंकला मनीं । तों देव मंद हास्य करोनी । **'सुसुखं कर्तुं'** म्हणोनी । या पांचा अक्षरीं बोलतसे. ॥ १८७ ॥ कीं उपजोनिही वैराग्य । अभ्यास करी सभाग्य । तथापि त्यास वाटे अभाग्य । प्रत्यक्ष हें दिसतसे. ॥ १८८ ॥ कीं वाटतां फुलांचा हार । संतोष वाटे अपार । पूर्वसंस्कारें सर्पाकार । भासतां भयें तोचि कांपे. ॥१८९॥ गारोडियास हार । सुखावह आणि सर्पाकार । भय न करी म्हणोनि लावितां कर । सुखस्पर्श हार तो साच लागे. ॥ १९० ॥ हें प्रत्यक्षही वासुदेव । स्वयें दिसतो देवाधिदेव । हें समजला तो स्वयमेव । हें प्रत्यक्ष सकळही. ॥ १९१ ॥ ज्यास ऐसा प्रत्यक्ष अवगम । त्यास तो पूर्वोक्त योगही सुगम । हें पुढिल्या अध्यायीं पुरुषोत्तम । बोलेल या श्लोकीं. ॥ १९२ ॥

उत्तराध्यायश्लोक—**'एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ।**
सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥'

हे माझी विभूती । आणि योग माझा बरवे रीती । जो जाणेल त्याची वृत्ती । योजेल योगीं न कांपतां. ॥ १९३ ॥ पुढें टीका होईल सविस्तर । येथें बोलणें हेंचि सार । कीं योगीं वृत्ति होय स्थिर । अनायासें करितां.

॥ १९४ ॥ म्हणोनि हा उत्तराध्यायश्लोक । बोलेल ऐसा उत्तमश्लोक । कीं हे महर्षि सप्त चत्वारि सनकादिक । विभूति माझी. ॥ १९५ ॥ आणि बोलेल **'पश्य मे योगमैश्वरं'** म्हणोनी । नवमाध्यायीं ईश्वरत्व योग स्वमुखें करोनी । हे विभूति आणि तो योग जो ज्ञानी । तत्त्वतां जाणेल. ॥ १९६ ॥ तो अविकंपयोगें करोनी । योजेल येथें संशय नसे म्हणोनी । म्हणे कीं चित्त स्वरूपीं लागोनी । न कांपे अविकंपयोग तो म्हणावा. ॥ १९७ ॥ षष्ठाध्यायांत अर्जुन । दुर्निग्रह म्हणूनि म्हणे मन । तरी सगुण भक्तीवांचून योग कठिण । या भावें श्रीकृष्णही बोलिला. ॥ १९८ ॥ ते सगुणभक्ति ज्ञानहीन । अविद्यायुक्त तिचें भजन । परि त्या भक्तीनें होणार आत्मज्ञान । त्या ज्ञानें सगुणज्ञान हें उमजे. ॥ १९९ ॥ या सगुणज्ञानाचें नांव योग ऐश्वर । कीं ईश्वरत्व योग हें चराचर । तें जो जाणेल म्हणे सर्वेश्वर । तो अविकंपयोगें योजेल. ॥ २०० ॥ तंतुरूपें पाहणें पट । मृत्तिका मात्र पाहणें घट । ब्रह्मचि विश्व निपैट । हा योग बाणे या ज्ञानें. ॥ २०१ ॥ आत्मा तंतु सत्यत्वें पहावा । जड पटाकार मिथ्यत्वें त्यजावा । हें येथें नसे परि चित्प्रकाशें भजावा । चराचररूपें भगवंत. ॥ २०२ ॥ त्या चित्प्रकाशाविण । न कळे हें ज्ञान सगुण । तेव्हां अनायासें बाणे खूण । त्या योगाचीही. ॥ २०३ ॥ एवं तो योग या ज्ञानें बाणे । आणि मग या योगेंचि हें ज्ञान जाणे । प्रत्यक्ष भगवद्रूप या खुणें । जो पावला. ॥ २०४ ॥ या ज्ञानाचा प्रताप । ऐसा कीं जड जग दिसे भगवद्रूप । तेव्हां अनायासें चित्स्वरूप । पटीं तंतू ऐसें जडीं ब्रह्म दिसों लागे ॥ २०५ ॥ तेव्हां न करितां कष्ट । साधन न लगे उत्कृष्ट । निर्गुण विश्वरूपें स्पष्ट । दिसे तें सगुणज्ञान हें धर्म्य प्रत्यक्ष. ॥ २०६ ॥ **'सुसुखं'** म्हणजे अतिशय सुख । जेथें साधन यत्न न दिसे दुःख । जें तें **'विश्वतोमुख'** । भगवद्रूप प्रत्यक्ष हें. ॥ २०७ ॥ प्रत्यक्ष भगवद्रूप हें ज्ञान । जालें परि करावें जतन । त्यासही म्हणे कृपाळू कमलनयन । **'सुसुखं कर्तुं'** म्हणोनी. ॥२०८॥ जरी विश्वात्मअन्वययोगाविण । हें प्रत्यक्ष धर्म्य ज्ञान सगुण । नोहे परि तेंही जडचैतन्य एकत्वखूण । या ज्ञानेंचि दृढ बाणते. ॥ २०९ ॥ याविषयीं उत्तमश्लोक । उत्तराध्यायांत बोले जो श्लोक । त्याचा निर्णय सुज्ञ लोक । पूर्वापर विचारदृष्टी पाहोत. ॥ २१० ॥ आतां प्रत्यक्ष हें जें दिसे । हेंचि धर्म्यज्ञान असे । तरी हें प्रत्यक्ष नाशतें ऐसें । शोधक कोणी म्हणती ये स्थळीं.

---

१. अतिशय, पुष्कळ.

॥ २११ ॥ हें सर्वज्ञशिखामणी । जाणोनि म्हणे चक्रपाणी । शेवटीं श्लोका-
चिया चतुर्थचरणीं । म्हणे कीं हें अव्यय. ॥ २१२ ॥ अव्यय म्हणजे नव्हे
जें नाशवंत । आणि हें तरी नासोनि असे उपजत । आणि अव्यय म्हणतो
भगवंत । तेव्हां युक्तीनें हें साधावें. ॥ २१३ ॥ जें कालचें मृगजळ । तें
आजचें दिसे पुष्कळ । तैसें भगवद्रूप हें केवळ । आविर्भाव तिरोभाव दावितें.
॥ २१४ ॥ दृष्टी दिसे देव । त्यास म्हणावें आविर्भाव । न दिसे तेव्हां
तिरोभाव । पावला म्हणावें. ॥ २१५ ॥ रासक्रीडा प्रथम राती । गोपी गर्व
करितां जगत्पती । अंतर्धान पावोन मागुती । प्रगट जाला. ॥ २१६ ॥ तै-
सेंचि विश्व पावोनि लय । पुन्हा पावतां उदय । तेंचि म्हणावें हें अव्यय ।
प्रत्यक्ष हें. ॥ २१७ ॥ येथें हें प्रत्यक्षचि अव्यय । कृष्ण म्हणतो हा पोटीं
निश्चय । समजोनि धरी धनंजय । कीं प्रश्न करील, ऐसाच विश्वरूपा.
॥ २१८ ॥ **'मन्यसे यदि तच्छक्यं'** या श्लोकें करोनी । **'दर्शयात्मा-
नमव्ययं'** म्हणोनी । अव्यय देह आपला दावी याचि वरोनी । विश्वरूपास
हाही अव्यय म्हणेल. ॥ २१९ ॥ की चित्स्वरूप कळलें खरें । परि विश्वरूप
न दिसे बरें । म्हणोनि हेंचि जग पाहेल आदरें । दिव्यचक्षू करोनि. ॥२२०॥
एवं प्रत्यक्ष हें स्वयें पुरुषोत्तम । म्हणोन या ज्ञानाचें नांव प्रत्यक्षावगम । हें
अव्यय म्हणोनि सर्वोत्तम । हें ज्ञानही अव्यय म्हणतसे. ॥ २२१ ॥ ज्ञान तेंचि
ज्ञेय । तेंचि ज्ञाता हा निश्चय । एक अविद्या जातां अव्यय । सर्वही.
॥ २२२ ॥ हा सकळ जगाचा लय उदय । परि शरीरें नाशती हा निश्चय ।
तो देह पुन्हा नये तेव्हां अव्यय । कैसें म्हणावें ? ॥ २२३ ॥ तरी नाचत
नाचत नट । पांघरला असे जो पट । [१]घुंगट घेवोनि निपट । बायको स्वशरी-
रचि दाखवी. ॥ २२४ ॥ तेव्हां ते बायको उपजली । पदर काढितां मागुतीं
मेली । पुनः घुंगट घेतां जन्मली । काय ते म्हणावी ? ॥ २२५ ॥ अवघें
मिळोन तो नट । किंवा त्याचा तो पट । दोहींची जे खटपट । ते ही तो नट
आणि तो पटचि त्याचा. ॥ २२६ ॥ गर्भापासोनि जों स्मशान । आपणास
आपण जो जगज्जीवन । कल्पून दावी होऊनि जननयन । स्वयेंचि पाहे.
॥ २२७ ॥ या धर्म्यज्ञानरज्जूवरी । अविद्या सर्प निर्माण करी । जन्ममरण षड्-
[२]गुण कूसरी । सत्यत्वें जग दोरीच दावितें. ॥ २२८ ॥ ते ही शक्ति त्याची ।
त्याच्या प्रकाशाविण ते कैंची ? । परि ते जों आहे तों साची । संसारबाधा आणि

---

१. नाईंस्त होणें. २. पांघरुण, बुरखा.

जीवत्व जीवातें. ॥ २२९ ॥ एवं हें ज्ञान म्हणतां अव्यय । भाव इतका समजे धनंजय । पिकलें पीक अतिशय । भाग्याचें जयाचिया. ॥ २३० ॥ परि एक उपजली शंका । ते तत्काळ कळली श्रीवत्सांका । म्हणोनि पुढिलिया श्लोका । बोलों पाहे. ॥ २३१ ॥ सुखसाध्य अत्यंत हें ज्ञान । जें सांगों पाहतो कमलनयन । तरी कां मृत्युमुखीं सर्वजन । दीसती? ॥ २३२ ॥ त्यांत केवळ मूढ अंध । ते वेदशास्त्रांचा नेणतीच कीं गंध । जे वाचिती वेद शास्त्र पुराण प्रबंध । कां तेही पडती मृत्युमुखीं? ॥ २३३ ॥ हा दयालु जगत्पती । वेदीं शास्त्रीं या ज्ञानरीती । बोलिला असे तें जे वाचिती । ते कां पडती मृत्युमुखीं? ॥ २३४ ॥ हा अर्जुनाचा भाव । समजोनि उत्तर देतसे देव । कीं स्वघात स्वयमेव । ते लोक करिती. ॥ २३५ ॥ कीं ज्याच्या प्राप्तीस जें द्वार । त्या द्वारें न जाती पामर । म्हणोनि मृत्युमुखीं पडती नर । हें सर्वेश्वर बोलतो या श्लोकीं. ॥ २३६ ॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

अगा! या ज्ञानाचा धर्म । म्हणिजे या ज्ञानप्राप्तीस मार्ग सुगम । त्याची अश्रद्धा ज्यास त्यातें दुर्गम । कैसें नव्हे ज्ञान हें? ॥ २३७ ॥ ज्या धर्में हें ज्ञान । पाविजे तेंचि याचें साधन । त्या धर्माचे अश्रद्दधान । श्रद्धाहीन केंवी यातें पावती? ॥ २३८ ॥ चहूंकडोनि कांटे । कल्पवृक्षास पावणें ज्या एकेच वाटे । त्या वाटे न जातां केंवी भेटे । तो कल्पवृक्ष? ॥२३९॥ जरी म्हणों मार्ग चुकले । नेणोनि सर्वांस मुकले । तरी वेद शास्त्र पुराणें शिकले । भागवतधर्म काय ठाउके नसती? ॥ २४० ॥ एक श्रीकांत सर्वेश्वर । नव्हती मुक्तिप्रदा देवता इतर । ऐसे अव्यभिचार भजनीं तत्पर । होती तरी या धर्मेंच मज पावती. ॥ २४१ ॥ मीच राजविद्याराजगुह्यस्वरूप । मीच प्रत्यक्ष आणि प्रत्यक्षावगम बोधरूप । नानारूप मीच अरूप । असें आपणा आपण कल्पूनी ॥ २४२ ॥ त्या मातें पावणें अर्जुना! । हेंच कीं पावणें या ज्ञाना । तरी याच्या धर्मानुष्ठानाविना । प्राप्त नव्हे हें ज्ञान मद्रूप. ॥ २४३ ॥ या भावें म्हणे सर्वेश्वर । कीं याच्या धर्माचे अश्रद्दधान नर । मातें न पावोनि पामर । मृत्युसंसारमार्गी परतती. ॥ २४४ ॥ ज्यास जें ठाउकेंच नाहीं । तो अश्रद्दधान म्हणवेना कांहीं । एवं भागवतधर्म जाणोनिही । अश्रद्दधान जे श्रद्धा न धरिती. ॥ २४५ ॥ आणि याच्या धर्माचे अश्रद्दधान । म्हणजे प्रस्तुतीं बोलों पाहतों जें ज्ञान । ते या

ज्ञानाच्या धर्माचे अश्रद्दधान जन । ते मातें न पावोनि मृत्युसंसारमार्गीं परतती. ॥ २४६ ॥ म्हणिजे प्रत्यक्ष स्थावर जंगम । हेंचि मी ऐसा अवगम । हा न होतां प्रत्यक्षावगम । मृत्युसंसारमार्ग हेंचि प्रत्यक्ष. ॥ २४७ ॥ आतां 'निवर्तंते' म्हणिजे परतती । तरी काय पावोनि फिरती मागुती ? । मृत्युसंसारमार्गीं पहिलेच असती । परतती ते कैसे ? ॥ २४८ ॥ हा संदेह तरी उत्पन्न होता । कीं अश्रद्दधान जरी न म्हणता । आणि याच्या धर्माचे अश्रद्दधान तत्त्वता । हेंही बोले. ॥ २४९ ॥ कीं या ज्ञानातें पावला । तो तों अमृतचि प्याला । मृत्यु-संसारमार्गीं त्याला । परतणें कैचें ? ॥ २५० ॥ आतां मृत्युसंसारमार्गीं असती । परि अमृत पावेल जेथें सुमती । त्या गृहाच्या द्वारास पावती । आणि परतती अमृत येथें नसेल म्हणोनी. ॥ २५१ ॥ गीता भारत भागवत । यांत या ज्ञानप्राप्तीचे धर्म विहित । ते वाचोनि आयकोनि म्हणती यांत । काय आहे म्हणोनी. ॥ २५२ ॥ नेत्रीं रोग केवळ । पित्रळा दिसे चंद्र उज्ज्वळ । ताका-सारिखेंचि दूध धवळ । ज्यास वाटे. ॥ २५३ ॥ इतरदेवतापूजन । आणि भागवतधर्में भगवद्भजन । समान मानूनि ते जन । श्रद्धा न धरिती या ज्ञान-प्राप्तिधर्माची. ॥ २५४ ॥ अमृतसत्रद्वारास जाती । आणि कांजीच असेल मानिती । आणि अन्यत्र जाऊनि कांजीच पिती । जे पीतचि होते सर्वदा. ॥ २५५ ॥ तथापि अमृतप्राप्तीचें द्वार । पावोनि परतले म्हणावे ते नर । ऐसे परतती म्हणे सर्वेश्वर । अश्रद्दधान या ज्ञानप्राप्तिधर्मांचे ॥ २५६ ॥ येथें अगा ! परंतप ! म्हणोनी । बोले अर्जुनातें आळवूनी । गहनभाव हृदयीं धरोनी । परंतप म्हणतसे. ॥ २५७ ॥ कीं पर जे वैरी । त्यांतें युद्धीं संताप करी । त्यातें संस्कृत वैखरी[2] । परंतप म्हणतसे. ॥ २५८ ॥ तरी शत्रुसंहारकर्म । क्षत्रि-याचा स्वधर्म । तें कृष्णार्पण करितां तुटे भ्रम । कृष्णप्रसादें अविद्येचा. ॥ २५९ ॥ हें तृतीयाध्यायीं कळलें वर्म । कीं विना कृष्णार्पण इतर कर्म । बंधक, म्हणोनि जो जो स्वधर्म । तो या कृष्णास अर्पावा. ॥ २६० ॥ 'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र' । या श्लोकीं बोलिला कमलनेत्र । कीं कृष्णार्पणाविण कर्म-मात्र । बंधक म्हणोनी. ॥ २६१ ॥ शत्रुसंतापरूप कर्म । भगवंतीं अर्पितां भागवतधर्म । जाणि भगवंत तोचि सगुणब्रह्म । कृष्णरूपें हा अवतरला. ॥ २६२ ॥ हें चतुर्थाध्यायांत अर्जुन । समजला जेथें कमलनयन । 'परि-त्राणाय साधूनां' इत्यादि वचन । स्वावनारविषयीं बोलिला. ॥२६३॥ सप्तमीं

१. ज्ञान. २. वाणी, भाषा.

इतरदेवताराधन । नश्वर फलाचेंचि साधन । अनंतफल अनंताचेंच भजन । हेंही अर्जुन समजला. ॥२६४॥ 'कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः । प्रपद्यंतेऽन्यदेवताः' म्हणोनि अर्जुना ! । बोलिला इत्यादि श्लोकरचना । बिंबली हृदयीं अर्जुनाच्या. ॥ २६५ ॥ अष्टमीं मातें स्मरोनी । युद्ध करीं म्हणोनी । 'तस्मात्सर्वेषु कालेषु' या श्लोकें करोनी । तें दृढ धरिलें मनीं अर्जुनें. ॥ २६६ ॥ कीं सर्वदा यातें स्मरणें । आणि स्वधर्म युद्ध हें करणें । आणि स्वधर्म समर्पणें । चरणीं याचिया. ॥ २६७ ॥ आणि देवता सर्वांत । थोर हा भगवंत । या भावें स्वधर्मविहित । समर्पणें चरणीं याचिया. ॥ २६८ ॥ सर्वांत थोर नारायण । म्हणोनि या भावें स्मरोनी समर्पण । स्वकर्माचें करणें हें प्रथम लक्षण । भागवतधर्माचें. ॥ २६९ ॥ हे भागवतधर्मपदवी । जनकरायास नव योगियांत कवी । श्रीमद्भागवतीं बोलिला बरवी । या श्लोकें करोनी. ॥ २७० ॥

एकादशस्कंधश्लोक—'कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा
बुद्ध्यात्मना वानुसृतस्वभावात् ।
करोति यद्यत्सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयेत्तत् ॥'

श्लोकार्थ—कवी म्हणे भागवतधर्म । राया ! पुसतोसि तरी सकळ कर्म । नारायणाकारणें समर्पावें हें वर्म । भागवतधर्माचें. ॥ २७१ ॥ काया वाचा मन इंद्रियें बुद्धी । ज्या ज्या करितां ज्या ज्या कर्माची समृद्धी । अथवा अहंकारेंही कर्मसिद्धी । अनुसरला संस्कार त्यास्तव. ॥ २७२ ॥ ऐशा ज्या ज्या करितो क्रिया । त्या त्या नारायणाकारणें जनकराया । अर्पण कराव्या नारायणा देवराया । सर्वांत थोर ऐसें स्मरोनी. ॥ २७३ ॥ 'परस्मै नारायणायेति । समर्पयेत्' ऐसें पदापुढें पद योजी सुमती । आणि बोले जनकरायाप्रती । कीं सर्वांत थोर नारायण म्हणोनि अर्पावें. ॥ २७४ ॥ या श्लोकीं आत्मशब्दें अहंकार । अनुसृतस्वभाव म्हणिजे पूर्वसंस्कार । जो निरहंकार त्यासही हा प्रकार । कर्मसमर्पणीं बोलिला. ॥ २७५ ॥ कीं काया वाचा इंद्रियें । मनाच्या संकल्पें बुद्धिनिश्चयें । कर्म करिती कांहीं स्वयें । करीत नाहीं. ॥ २७६ ॥ कर्तृत्व मानी अहंकार । त्यावेगळा आत्मा कळला निर्विकार । तो अकर्ता परि पूर्वसंस्कार । अनुसरला असे बुद्धीतें. ॥ २७७ ॥ 'अनुसृतस्वभावात्' या वचनें करोनी । हा अर्थ दावी वदोनी । उगेंचि अनुसरल्या संस्कारें म्हणोनी । अर्थ येथें न वदवे. ॥ २७८ ॥ कीं उगाच काडिया मोडी । कीं उगाच रेघा ओढी घेऊनि काडी । उगाच

दांतें नखें तोडी । बुद्धिपूर्वक नव्हे हें कर्म. ॥ २७९ ॥ कोणी जे ते कीं जे ते कीं म्हणोनी । इत्यादि वृथा शब्द प्रतिवचनीं । बोलती लटक ऐसी वाचेची जनीं । बुद्धिपूर्वक नव्हे हेंही. ॥ २८० ॥ हा अनुसृतस्वभाव । म्हणोनि जरी काढावा भाव । तरी तेंही काया वाचा मन इंद्रियांत सर्व । कर्म आढळे. ॥ २८१ ॥ बुद्धिपूर्वक कर्में न होती । तथापि काया वाचा इंद्रियेंचि तीं करिती । अर्थ अन्यथा कोणे रीती । न योजे येथें. ॥ २८२ ॥ निरहंकारियासही अहंकारें । आत्मविस्मृतींत पूर्वसंस्कारें । मी कर्ता वाटे तें याप्रकारें । अबाधित अर्थ अनुसृतस्वभावाचा ॥ २८३ ॥ तें असो या प्रस्तुतीं । **'परस्मै नारायणायेति'** म्हणोनि ये रीती । कर्में समर्पावीं ऐसें जनकाप्रती । कवी वडील नव योगियांत तो बोले. ॥ २८४ ॥ हें समजला अर्जुन । कीं सर्वांत थोर हा कमलनयन । स्वधर्म यास अर्पूनि नमन । सर्वदा यातें करावें. ॥ २८५ ॥ प्रथम भागवतधर्म । कीं कृष्णचरणीं समर्पावें कर्म । परि हा सर्वांत थोर हें वर्म । **'परस्मै नारायणायेति'** म्हणजे या प्रकारें. ॥ २८६ ॥ त्यांत अर्जुनाचा स्वधर्म । शत्रुसंहार शौर्यकर्म । इतका अर्थ सगुण ब्रह्म । स्मरोनि म्हणे 'अगा परंतपा!' म्हणोनी. ॥२८७॥ कीं पुढें बोलों पाहतो जें ज्ञान । त्या त्या धर्माचे जे अश्रद्दधान । ते मातें न पावोनि मरण जनन । या संसारमार्गीं निघाले. ॥ २८८ ॥ म्हणोनि बोलिलों मी अर्जुना! । तरी ह्मणी वाटेल तुझ्या मना । कीं भागवतधर्म जरी मजही घडेना । तरी मीही पावेना ज्ञान हें. ॥ २८९ ॥ तूं युद्ध स्वकर्म टाकावया । सिद्ध होतासि धनंजया!। आतां परांतें ताप युद्धीं कराया । सिद्ध जालास या गीताश्रवणेंच कीं. ॥ २९० ॥ एवं गीतार्थ तुजला । जेव्हां हृदयांत बिंबला । तेव्हां स्वधर्म अर्पिसील निश्चित मला । ज्या धर्में ताप शत्रूतें. ॥ २९१ ॥ मज समर्पी सर्व कर्म । तयास घडलेच भागवतधर्म । या ज्ञानप्राप्तीचें वर्म । सांपडलेंचि तुजला. ॥ २९२ ॥ या गूढभावें करोनी । त्यातें परंतप म्हणोनी । स्वमुखें श्रीकृष्ण आळवूनी । बोलावें तें येथोनि बोलेल. ॥ २९३ ॥ एवं बोलों पाहतो ज्ञान । याच्या साधनरूप धर्माचा अश्रद्दधान । होव श्रोता पंडुनंदन । हें मधुसूदन बोलिला. ॥ २९४ ॥ याच्या धर्माचे अश्रद्दधान । ऐसें स्पष्ट येथें बोले कमलनयन । कोणी वाखाणिती कीं श्रद्धाहीन । या ज्ञानाचेच म्हणोनी. ॥ २९५ ॥ नीट अर्थ ऐसा सोडूनी । धर्मशब्दें ज्ञान मानूनी । वाखाणिती या करोनी । संमत नव्हे तो अर्थ. ॥ २९६ ॥ भागवतधर्म नेणती । ते भ-

ळतैसी गति कल्पिती । परि एकेपरी घडे हेही रीती । अर्थ वदती जरी तैसा. ॥ २९७ ॥ कीं परम भागवतधर्म । हें ज्ञान जेथें विश्वचि हें सगुणब्रह्म । जरी ऐसें घडे तरी परम उत्तम । संमतचि आम्हां अत्यंत. ॥ २९८ ॥ असो तें आतां ज्ञान विज्ञानसहित । सांगेन तूतें म्हणोनि बोलिला भगवंत । तें दों श्लोकीं अनंत । बोलों पाहतो. ॥ २९९ ॥ त्यांत पुढिलिया श्लोकाचा एक चरण । तेथवरी आदीं ज्ञानाचें विवरण । दुसरिया चरणीं जगद्वंद्यचरण । विज्ञान बोलेल पुढिलिया श्लोकांत. ॥ ३०० ॥ त्याच्या उत्तरार्धेंकरोनी । तें विज्ञानचि सांगेल विवरोनी । प्रस्तुत ज्ञान आरंभोनी । बोलतसे श्लोक ॥३०१॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥
न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

अगा! म्यां हें जग सकळ । व्यापिलें असे पाहें निवळ । जे अव्यक्तमूर्ती केवळ । त्या चित्स्वरूपें करोनी. ॥३०२॥ पुढिलिया श्लोकीं **'पश्य'** म्हणोनी । बोलेल त्या शब्देंकरोनी । पांचां प्रकारें तत्त्व विवरूनी । पाहें पाहें ऐसें पांचाठायीं बोलतो. ॥ ३०३ ॥ पूर्वाध्यायीं अपरोक्ष । अर्जुनास उपदेशी पद्मपत्राक्ष । तो हें पहायास जाला दक्ष । म्हणोनि पाहें पाहें म्हणतसे. ॥ ३०४ ॥ चतुर्थाध्यायांत मागें । ज्ञानार्थ संतवंदनप्रश्नसेवाप्रसंगें । बोलियेलें ऐसें श्रीरंगें । कीं त्या ज्ञानें व्यापका आपणांत सर्व भूतें देखसी. ॥ ३०५ ॥ त्यास अष्टमीं अव्यक्त मूर्तीची खूण । चिदात्मत्वें कळे ऐसा केला निपुण । आतां व्यापक अव्यक्त मूर्ती निर्गुण । पाहें म्हणतसे अपरोक्ष. ॥ ३०६ ॥ **'येन भूतान्यशेषेण'** । या श्लोकीं चतुर्थी कमलेक्षण । अपरोक्ष साक्षात्कारलक्षण । परोक्षरीती ऐसें बोलिला. ॥ ३०७ ॥ कीं ज्या ज्ञानें करोनी । आपणांत सर्व भूतें देखसी त्यावरोनी । मजसीं ऐक्य देखसी म्हणोनी । शब्दबोधें बोलिला. ॥३०८॥ अष्टमीं **'अक्षरं ब्रह्म'** । या श्लोकीं क्षरातीत आत्मा तोचि ब्रह्म । हा बोध करूनि निर्गुण ब्रह्म । येथें व्यापकत्व त्याचें आदीं दाखवी. ॥ ३०९ ॥ परि म्हणतां म्यां हें व्यापिलें । झणी चतुर्भुजरूप आपलें । ये स्थळीं पाहेल जें बैसलें । रथीं याच्या एकत्र. ॥ ३१० ॥ आणि म्यां व्यापिलें न म्हणे जरी । गुरु देव याचा मीच हरी । माझें ऐक्यानुसंधान तरी । अंतरेल. ॥ ३११ ॥ आणि आत्मयांत सर्वां भूतांसी । पाहसी तेव्हां ऐक्य मजसी । देखसी ऐसें चतुर्थी यासी । **'येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि'** ऐसें बो-

लिलें. ॥ ३१२ ॥ तरी हें आणि तें एक । श्रोते समजोत पार्थादिक । ऐसें बोलतो श्रीवत्सांक । **'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना'** म्हणोनी. ॥ ३१३ ॥ कीं व्यक्ति पावली सगुण मूर्ती । हे चतुर्भुज माझी पवित्र कीर्ती । तेही न दिसे जेथें ऐसी चिदात्मस्फूर्ती । शुद्धशुद्धसत्त्वेंकरोनी. ॥ ३१४ ॥ परि तें सत्त्व आणि तेंचि ब्रह्म । सगुण साकारिलें सधर्म । आतां पाहसी त्या सत्त्वें तेंचि निर्धर्म । तों तेथें नसे व्यक्त हे मूर्ती. ॥ ३१५ ॥ मीच तें शुद्ध चित्स्वरूप । परि अव्यक्तमूर्ति बोलावें अरूप । कीं नाहीं व्यक्त हें अवताररूप । त्या निजस्वरूपीं माझिया अर्थ ऐसा. ॥ ३१६ ॥ कोणी येथें ऐसें म्हणती । कीं अव्यक्तमूर्ति म्हणजे अतींद्रियमूर्ती । ऐसी मूर्ति म्हणजे अमूर्तिस्फूर्ती । ऐसें वाखाणिती हें पद. ॥ ३१७ ॥ तरी जे स्वस्वरूपस्फूर्ती । ते उगीच म्हणावी अमूर्ती । अमूर्तीस म्हणोनि मूर्ती । मूर्तित्वपरिहारार्थ अव्यक्तपद योजावें. ॥ ३१८ ॥ इतके आढे वेढे घेउनी । कां म्हणावें अव्यक्तमूर्ति म्हणोनी । हा बाधित अर्थ यावरोनी । अबाधित अर्थ येथें सूचवी. ॥ ३१९ ॥ अर्थ हाचि कीं म्यां व्यापिलें । म्हणतां पाहेल मूर्तिमंत हें रूप आपलें । तें हें नव्हेचि म्हणतां आलें । भिन्नत्व दोहींसही ॥ ३२० ॥ तरी म्यांच व्यापिलें परी । त्या स्वरूपीं व्यक्त नाहीं मूर्ति बरी । जरी अवतारमूर्ति नानापरी । व्यक्ति त्याच्याच बोलाव्या. ॥ ३२१ ॥ एवं म्यांच त्या अव्यक्तमूर्तीकरोनी । जग सर्व व्यापिलें म्हणोनी । पाहे म्हणतां भगवदैक्य त्यावरोनी । चिदात्मत्व आपलेंचि तो पाहे. ॥ ३२२ ॥ सहज ज्या चिदात्मत्वस्फूर्तिविना । चराचर कांहींच दिसेना । तो अव्यक्तमूर्ति आत्मा अर्जुना । सर्वांभूतीं दिसों लागला. ॥ ३२३ ॥ तंतु न दिसे दृष्टीं । तो काय दिसेल पट सृष्टीं ! । होणेंचि न लगे कष्टीं । सर्वभूतीं आत्मा पाहतां. ॥ ३२४ ॥ व्यापकत्व पार्थ पाहे । याच अनुभवीं गुंतोन राहे । तों देव म्हणत आहे । **'मत्स्थानि सर्वभूतानि'** म्हणोनी. ॥ ३२५ ॥ कीं पाहे व्यापकत्वाकडे । परि अनंतत्वीं दृष्टि न पडे । तृतीय चरणीं हेही दृष्टि उघडे । सर्वभूतें मजमाजीं ऐसें बोलतां. ॥ ३२६ ॥ कीं ब्रह्मांड आवरणासहित । मन धांवे तेथपर्यंत । पुढें धांवतां अत्यंत । तेंचि पंगुत्व अवलंबी. ॥ ३२७ ॥ मनास त्याच्या प्रकाशें मनपण । त्या प्रकाशींच या चराचराची खूण । ऐसें ब्रह्मांडसहित सप्तावरण । आयकोन मन जाणें धांवे तेथवरी. ॥ ३२८ ॥ पर्वताचें उंच शिखर । तेथोनि दृष्टि चाळी नर । तों सूर्यप्रकाशाचे वरी पसर । पसरे त्याच्या दृष्टीचा. ॥ ३२९ ॥ त्याच तेजें प्रकाशली । त्याच तेजें जग

पाहों लागली । पाहतां तेचि भागली । तेज उरलेंचि तें असे. ॥ ३३० ॥ अनंतत्वाच कारणें । हा दृष्टांत लागला घेणें । हें नव्हे अद्वैत बोलणें । कीं दृष्टांतीं सर्वसाम्य न घडेच. ॥ ३३१ ॥ समुद्राच्या अनंत लहरी । दृष्टि धांवतां त्यांवरी । दृष्टि भागे परि असेच उरी । पुढेंही समुद्राची. ॥ ३३२ ॥ इत्यादि दृष्टांत एकदेशी । प्रस्तुत श्रीकृष्ण उपदेशी । चैतन्य मनीं आणि सर्वदेशीं । सर्वभूतें मजमध्यें म्हणोनी. ॥ ३३३ ॥ तीं सर्वभूतें अर्जुनें । स्वरूपीं पाहतां मनें । अनंतत्व अनुभवितां जगज्जीवनें । पुढें बोलों आरंभिलें. ॥ ३३४ ॥ कीं म्हणी आकाशीं भूतें जैशीं । चित्स्वरूपीं जडें पाहे तैशीं । किंवा जळीं भिजलीं वस्त्रें ऐशीं । व्यापका परि भिन्नत्व. ॥ ३३५ ॥ या भेदाचा परिहार । करी चतुर्थचरणीं जगदुद्धार । कीं मजमाजीं आहेत भूतें चराचर । परि त्या भूतांत मी असेना. ॥ ३३६ ॥ सर्वांत व्यापकता प्रथम बोलोनी । तीं मजमध्यें आहेत हें अंगीकारोनी । आतां मी त्यांत नाहीं म्हणोनी । बोलतां विरोध अत्यंत. ॥ ३३७ ॥ हें बोलिला सर्वेश्वर । ज्या युक्तीनें घडे विरोधपरिहार । त्या युक्तीचा करोनि विचार । एकवाक्यता साधावी. ॥ ३३८ ॥ आतां भूतें मजमाजीं असती । परि मी नसें तयां भूतीं । जैसे फेस उदकीं तरंगती । परि उदक नसे तया फेंसांत. ॥ ३३९ ॥ ऐसें कोणी बोलती । म्हणोनी हेचि अंगीकारावी रीती । तरी येथेंचि म्हणतो जगत्पती । कीं तीं भूतेंही नसती मजमध्यें. ॥ ३४० ॥ जरी फेंसही जळीं नसे । तरी हा दृष्टांत युक्त असे । आतां फेंस जळाबाहेरही गवसे । परि तो जळीं नाहीं म्हणावा. ॥ ३४१ ॥ तरी भूतें मजमाजीं असती । हें जें बोलिला जगत्पती । विरोध येतसे त्याप्रती । वचन सर्वज्ञशिखामणीचें तेंही कीं. ॥ ३४२ ॥ आतां दृष्टांत साधेल तरी । कीं सोडोनि गोष्टी तिसरी । धरावी पहिली आणि दुसरी । कीं भूतें मजमाजीं मी भूतीं असेना. ॥ ३४३ ॥ उरली गोष्टी तिसरी। ते वेगळीच साधावी बरी। हे युक्त वाटे संतांस जरी । तिहीं संतीं दृष्टांत वेगळेच कां न बोलावे? ॥ ३४४ ॥ सर्वभूतें मजमाजीं । घटांत जैसी भरली असे कांजी । मी नसें त्या भूतांच्या समाजीं । जैसा घट नसे कांजींत. ॥ ३४५ ॥ दोहीं गोष्टींस एक दृष्टांत घडे । तिसरीस तो दृष्टांत उडे । तरी एकचि दृष्टांत एकीचकडे । लागे आणि दोंकडे न लागे न लागो. ॥३४६॥ ऐसा बोलतां अर्थ । होतो सर्वही अनर्थ । तीनी गोष्टी बोलिला समर्थ । कीं तिहीं गोष्टींत तत्त्व एक जाणावें. ॥ ३४७ ॥ एवं च तीनी गोष्टी । न साधतां एक दृष्टांत दृष्टी । अर्थ न लागे वृथा कष्टी । वैखरी करावी किमर्थ? ॥ ३४८ ॥

आतां ते थोर त्यांचा भाव । न कळे म्हणावा तरी देवाधिदेव । जें गूढ बोलिला स्वयमेव । भाव त्याचा कैसा उकलतो ! ॥ ३४९ ॥ शोधकांसही न कळे अर्थ । तरी टीका करावी किमर्थ ? । एवं उदंड जाले समर्थ । तरी विना अनन्यभक्ति हें न कळे. ॥ ३५० ॥ पूर्वश्लोकीं पुरुषोत्तम । बोलिला कीं या ज्ञानप्राप्तीचे धर्म । टाकितां न सांपडे हें प्रत्यक्षावगम । धर्म्यज्ञान विज्ञानसहित जें. ॥ ३५१ ॥ जे मंगलांचरणीं । लागती इतर देवतांचे चरणीं । त्यांस भगवंताचे जगद्वंद्यचरणीं । कैचें अनन्यभक्तित्व ! ॥ ३५२ ॥ द्वारचि ज्याचें न सांपडे । त्या गृहांतील निधि कैंवी ठायीं पडे ? । या ज्ञानाचें कवाड उघडे । अनन्यचरणशरणातें. ॥ ३५३ ॥ आतां असो ते कहाणी । प्रस्तुत काय वदे भगवद्वाणी । मजमाजीं भूतें म्हणे चक्रपाणी । परी त्या भूतीं मी नसें. ॥ ३५४ ॥ आणि मजमाजींही तीं भूतें । नाहींत पाहें म्हणे अर्जुनातें । या तिहीं विरुद्ध गोष्टीस होतें । एकवाक्यत्व एकाच दृष्टांतें. ॥३५५॥ सागरीं जेवीं कल्लोळ । तैसे मजमाजीं भूतांचे खेळ । कोटि कोटि ब्रह्मांडगोळ । मजमाजीं ऐसे. ॥३५६॥ किंवा किरणीं जैसें मृगजळ । नानानगीं कनक केवळ । कीं रज्जूंत जैसा व्याळ । तैसीं भूतें विवर्तरूपें अधिष्ठानीं मजमाजीं. ॥३५७॥ परि तरंगीं नसे सागर । कीं तो तरंग सागराचेंच नीर । उदय लय पावती आकार । ते कैंचे कीं त्यांत सिंधु असे ? ॥ ३५८ ॥ एकचि पाहतां जल । सिंधु आणि त्याचे कल्लोळ । तरंगाकारें दिसे लोळ । नाहींच तो. ॥ ३५९ ॥ एवं सागरीं तरंगाकार । तरंगीं नसे सागर । तैसें मजमाजीं चराचर । त्या चराचरीं मी नसें. ॥ ३६० ॥ किरणांत पाणी दिसे । परि किरणप्रभा त्यांत नसे । कीं किरणावांचोनि न गवसे । वेगळें सत्यत्वें किमपिही. ॥ ३६१ ॥ तेव्हां मृगजळीं नसती किरण । तैसेंच भूषणीं नसे सुवर्ण । कीं सुवर्ण तों पीतवर्ण । आकार नसती तया वेगळे. ॥ ३६२ ॥ सर्प रज्जूंत भासे । परि तो रज्जू त्या सर्पीं नसे । कीं रज्जू कळतां जरी तो दिसे । तरी रज्जू त्या सर्पीं होता म्हणावा. ॥ ३६३ ॥ ऐशा दृष्टांताच्या कोटी । श्रीकृष्ण धरूनि पोटीं । म्हणे भूतें मजमध्यें किरीटी । परि त्या भूतीं मी नसें. ॥ ३६४ ॥ ऐसें बोलिला हरी । तों शंका उपजली यावरी । कीं भूतें मिथ्या म्हणोनि जरी । त्यांत मी नाहीं म्हणतसे. ॥ ३६५ ॥ तरी जीं मिथ्या तीं मजमाजीं असती । हें विरुद्ध बोलिला जगत्पती । ऐसी म्हणे जों अर्जुनाची मती । तों म्हणे भूतेंही नसतीं मजमध्यें. ॥ ३६६ ॥ मजमाजीं सर्व असती या बोलें । अर्जुना यालागीं बोलिलों पहिलें । कीं हीं भूतें म्हणोनी होतें आलें ।

प्रतीतीस तुझ्या. ॥ ३६७ ॥ धरून तुझी हे प्रतीती । बोलिलों कीं भूतें मजमाजीं असती । मी भूतीं नसें म्हणोनि मागुती । तीं मिथ्या म्हणोनि आपल्या प्रतीतीनें बोलिलों. ॥ ३६८ ॥ माझी प्रतीति तूतें कळली । तेव्हां भूतें असत्य हे किल्ली आकळली । मग तुझी बुद्धि खवळली । असत्य तरी आहेत हें कां बोलिलासी ? ॥ ३६९ ॥ तरी माझिया मतें । मीच आहें नाहींत भूतें । मिथ्या प्रतीति याची तूतें । जाणतां गुह्य हें वदलों जें तत्त्व. ॥ ३७० ॥ अगा! एक रज्जूस जाणतो । एक त्यास सर्प म्हणतो । जाणे त्याच्या मुखें बोध जाणतो । कीं सर्प कधींच नव्हता रज्जुंत. ॥ ३७१ ॥ सुवर्णाचें केलें केळ । नेणतां म्हणे कदलीफळ । त्याची प्रतीति धरून केवळ । सुवर्ण सत्य आणि फळ मिथ्या सांगावें. ॥ ३७२ ॥ कीं फळ कदलीचें तुज दिसतें । हें सुवर्णें व्यापिलें सुवर्णीच असतें । परि हें पीतप्रभ सुवर्ण नुसतें । केळांत न असे कीं नाहींच तें केळें. ॥ ३७३ ॥ ऐसें म्हणतां नेणतां । सुवर्णत्वीं जाला जाणता । तो म्हणे केळें नाहीं तत्त्वतां । तरी आदीं आहे कां म्हणावें ? ॥ ३७४ ॥ तो या गोष्टीस पावला । तेव्हां केळेंही नाहींच म्हणावें त्याला । पूर्वी आहे म्हणोन या बोला । तुझ्या प्रतीतीनें बोलिलों म्हणावें. ॥ ३७५ ॥ तथापि केळासारिखें दिसे केळ । आणि केळ नाहीं आहे कनक केवळ । त्यास बोध जाणे ऐसा प्रांजळ । ये रीती ब्रह्मीं हीं भूतें. ॥ ३७६ ॥ एवं तत्त्वप्रकार चारी । पाहें म्हणोनि श्रीहरी । दाविता जाला येथवरी । तें ऐसें. ॥ ३७७ ॥ म्यां अव्यक्तमूर्तीनें सकळ । व्यापिलें पाहें निवळ । पटीं विणिलिया प्रतिमा समूळ । व्यापिल्या जैशा तंतूनें. ॥ ३७८ ॥ ऐसें पाहे म्हणोनि पहिलें । व्यापकत्व भूतीं दाविलें । त्या उपरी ऐसें बोलियेलें । कीं मजमाजीं भूतें हीं असती. ॥ ३७९ ॥ मजमाजीं हीं अमितें । पाहें अर्जुना सर्व भूतें । जैसीं विणिलीं प्रतिमाशरीरें बहुतें । तंतूमध्यें दिसती. ॥ ३८० ॥ तंतूंत त्या प्रतिमा नाना । परी तंतु प्रतिमारूपीं असेना । कीं जे पाहसी प्रतिमारूपरचना । ते तंतूच असे. ॥ ३८१ ॥ प्रतिमेचें जें जें गात्र । करचरणादि तें तें आहे तंतुमात्र । तंतूच असे तुझे नेत्र । जे अवयव देखती. ॥ ३८२ ॥ ऐसें पाहतां तंतूचि दिसे । तेव्हा प्रतिमा कैंच्या कीं त्यांत तो असे ? । ऐसी चित्स्वरूपीं[१] दृष्टि वसे । तेव्हां नसेच तें भूतीं कीं भूतेंच नसतीं. ॥ ३८३ ॥ आतां चैतन्याकडे सत्त्वदृष्टी । देऊनि पाहें सर्व सृष्टी । ऐसी करोनि करुणावृष्टी ।

१. चित्स्वरूप.

चौथी गोष्टी बोलतसे. ॥ ३८४ ॥ चौथे गोष्टीचें ये रीती। निमित्त बोलावें कीं भूतें समूळ नसती। म्हणोनि त्यांत नाहीं हा जगत्पती। तरी आहेत म्हणे पहिलें किमर्थ? ॥ ३८५ ॥ तरी शिष्यदृष्टी अंगीकारोनी। मजमाजीं भूतें म्हणे त्यावरोनी। यालागीं भूतेंही नसती मजमाजीं म्हणोनी। बोले हें निमित्त पूर्वीच बोलिलों. ॥ ३८६ ॥ परंतु 'पश्य' म्हणिजे पाहें। हा शब्द पांचाठायीं वर्तताहे। भूतें ही मजमाजीं नसती म्हणे हे। गोष्टी चौथी. ॥ ३८७ ॥ अर्जुना! जो जो आकार। दावी दृष्टी अलंकार। तो तो सोनेंचि निर्विकार। कनकपरीक्षक पाहतो. ॥ ३८८ ॥ तंतूकडे देतां दृष्टी। तंतूचि असे नसे पटप्रतिमा सृष्टी। ये रीती पाहें म्हणे हे चौथी गोष्टी। कीं भूतें नसतींच चित्स्वरूपांत. ॥ ३८९ ॥ ऐसा एक श्लोक एक चरण। दुसरिया श्लोकाचा येथवरी विवरण। सांगे जगद्वद्यचरण। निर्धर्म निर्गुण ज्ञानाचें. ॥ ३९० ॥ येथवरी जें 'पश्य'शब्दें पाहें म्हणे। तें बुद्धीनें पाहें म्हणतसे ऐसेंचि बाणे। विषय इंद्रियांसहित अर्जुन जाणे। कीं चित्स्वरूपचि हें जड प्रत्यक्ष. ॥३९१॥ प्रत्यक्ष कांहींच नसे। प्रत्यक्षांत बुद्धीस चित्स्वरूप गवसे। तथापि इंद्रियद्वारा दिसे। भास मात्र बुद्धीतें. ॥ ३९२ ॥ जें चित्स्वरूपाचें लक्षण। त्याहूनि जड हें विलक्षण। जरी मिथ्या म्हणोनि कमलेक्षण। प्रतिपदीं सूचवितो. ॥३९३॥ जड मिथ्या होय परी। शरीर आहे जोंवरी। हा प्रत्यय नव्हे दूरी। तरी उगेंचि काय मिथ्या म्हणावे? ॥ ३९४ ॥ यास काय म्हणोनि म्यां पहावें?। ऐसें जों अर्जुनें पुसावें। तों स्वयेंचि बोलिलें देवें। दुसरिया श्लोकीं चरणीं दुसरिया. ॥ ३९५ ॥

द्वितीयचरण—**पश्य मे योगमैश्वरम्** ।

अर्जुना जो भास दिसतो। माझा योग म्हणोनि पाहें सर्व तो। आणि योगही तो म्हणिजेतो। ऐश्वर म्हणोनी. ॥ ३९६ ॥ नसोनि दिसती रूपें नाना। अघटित म्हणावी हे घटना। अघटित घटनेस अर्जुना!। योग म्हणोनि बोलावें. ॥ ३९७ ॥ आहे सकळ चित्स्वरूप। नसे कांहींच जडरूप। तथापि भास जड भासें हा प्रताप। सामर्थ्याचा माझ्या म्हणावा. ॥ ३९८ ॥ हें मज ईश्वराचें चातुर्य। सामर्थ्य माझें ऐश्वर्य। वेद आणि मुनिवर्य। हेंचि रूप माझें वर्णिती. ॥ ३९९ ॥ **'सहस्रशीर्षा पुरुषः'**। इत्यादि ये विषयीं वेदघोष। मी जो ईश्वर परम पुरुष। तोचि अघटित घटनायोग हा. ॥ ४०० ॥ अत एव याच योगातें मुनी। म्हणती ऐश्वर म्हणोनी। हा योग ईश्वराचेंचि रूप या भावें करोनी। ऐश्वर म्हणावा हा योग. ॥ ४०१ ॥ एवं प्रत्यक्ष

जें दिसे । तें ईश्वराचेंचि रूप असे । म्हणोनि हे प्रत्यक्ष विलास ऐसे । पाहें माझा योग आणि स्वरूप म्हणोनी.॥ ४०२ ॥ योग म्हणजे युक्तिचातुर्यप्रकार । तरी योगचि माझे हे अवतार । ऐश्वररूपें हें जैसें तैसें चराचर । ऐश्वररूप माझें हें तूं पाहें. ॥ ४०३ ॥ उगाच मायाभास । त्याज्यांश मानूनि यास । कां पहावें प्रत्यक्षास? । म्हणोनि ईश्वररूप माझें तूं पाहें. ॥ ४०४ ॥ 'योगमैश्वरं' म्हणोनी । या पांचां अक्षरें करोनी । ईश्वराची योगमाया ऐसेंचि बोलोनी । बहुत गेले. ॥ ४०५ ॥ तरी ईश्वराचा देह । योगमायाच निःसंदेह । हेंचि तेही म्हणती परि स्नेह । सगुणभजनीं बहिरंगें. ॥ ४०६ ॥ म्हणोनि म्हणती स्वयोगमाया । पाहें म्हणतो धनंजया! । कीं प्रत्यक्षावगमबोधास[1] या । ते नाहीं पावले. ॥ ४०७ ॥ पाहें पाहें म्हणोनी । येथवरी निर्गुणतत्त्व दावुनी । पाहें योग ऐश्वर या शब्दें करोनि । म्हणती माया पाहें म्हणतसे. ॥ ४०८ ॥ यांत प्रत्यक्षावगमपण । आणि धर्म्यशब्दें ज्ञान सगुण । याची अणुमात्रही खूण । सांपडली नसे तयांतें. ॥ ४०९ ॥ योग आणि ऐश्वर । या दों शब्दीं सर्वेश्वर । रूप आपलें हें चराचर । पाहे म्हणोनी म्हणतसे. ॥ ४१० ॥ पाहतां दोनी अर्थ । व्याकरणसिद्ध यथार्थ । त्यांत माझें रूप पाहें हा समर्थ । अर्थ त्याहोनि होतसे. ॥ ४११ ॥ एकादशीं विश्वरूप । दाखवी तें तों ईश्वराचें होय रूप । तोही योगमायारचित आरोप । म्हणीं निर्गुणीं. ॥ ४१२ ॥ योग ऐश्वर म्हणोनी । त्या रूपाचें नांव याच दों पदीं करूनी । बोलेल एकादशीं त्यावरूनी । नवमीं प्रमाणसिद्ध हा अर्थ. ॥ ४१३ ॥

विश्वरूपाध्याय श्लोक—**न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।**
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥

अर्जुना! माते विश्वरूपेंकरोनी । पाहों न शकसी या स्वचर्मचक्षूंनीं । कीं सूर्यचंद्रांचीं रूपें दुरोनी । वीत वीत मंडलें दिसती. ॥ ४१४ ॥ हे अविद्याकर्मरचित दृष्टी । ईस मद्रूपचि दिसते हे जरी सृष्टी । परि कामलारोगें[2] जे कष्टी । ते शंखचंद्र पिंवळा देखते. ॥ ४१५ ॥ आणि भितीआड असे । तें या चर्मचक्षूंस न दिसे । एकसरेंचि या नेत्रांसि केंवीं गवसे । विश्व सर्वरूप माझें? ॥ ४१६ ॥ हेचि विश्वरचना परी । समग्र एकसरें आणि बरी । तू देखसी ऐशा परी । दिव्यचक्षु तुज मी देतसें. ॥ ४१७ ॥ त्या चक्षूकरोनी । योग ऐश्वर पाहें म्हणोनी । बोलेल विश्वरूपीं त्यावरोनी । योग ऐश्वर म्हणजे अघटितघटना रूप ईश्वराचें. ॥ ४१८ ॥ या दृष्टीं पाहों न शकसी

१. या प्रत्यक्ष ज्ञानाच्या बोधाला. २. काविळीच्या रोगानें जी दृष्टि कष्टी होत आहे.

मातें। तरी दिव्य दृष्टि माझा योग ऐश्वर त्यातें। पाहें म्हणोनि अर्जुनातें। पुढें बोलेल. ॥ ४१९ ॥ तेव्हां जें पाहणें योग ऐश्वरातें। हेंचि पाहणें मातें। ऐसें योग ऐश्वर शब्दें भगवंतें। स्पष्ट विश्वरूप आपलें बोलिलें. ॥ ४२० ॥ दिव्य चक्षूचें कारण। एकसरें पाहणें समग्रपण। अन्यथा सूर्य चंद्र ग्रह दिसोनि ही खूण। या दृष्टीस न दिसे त्याच्या रूपाची. ॥ ४२१ ॥ खाटप्रमाण वावडी गगनीं। ते वितीएवढी दिसे येथूनी। तैसेंचि चर्मचक्षूंस विश्व दिसोनी। बरें न दिसे आणि आड तें दिसेना. ॥ ४२२ ॥ पुढें याचे विचार। उदंड होतील येथें सर्वेश्वर। पाहें म्हणे योग ऐश्वर। प्रत्यक्ष विश्व ईश्वररूप म्हणोनी. ॥ ४२३ ॥ व्यतिरेकें आत्मा समजोनी। अन्वयें ब्रह्मचि सर्व उमजोनी। भास म्हणावा माया म्हणोनी। ते भक्त भगवद्रूपें पाहती. ॥ ४२४ ॥ याचें नांव विज्ञान। या मागें बोलिलें तें ज्ञान। हें प्रत्यक्षावगम धर्म्य हें श्रद्धान। पावती भागवत धर्माचे. ॥ ४२५ ॥ हें अनन्य भक्तांतें आकळे। इतरांतें अर्थचि न कळे। सयुक्त मुखरस चांगला गळे। परि नव्हे भगवद्गात्र [१]पीयूष तें. ॥ ४२६ ॥ एवं योग अघटित घटना। कीं नसोनि दिसे विश्वरचना। तेंचि ऐश्वर रूप ईश्वराचें अर्जुना!। पाहें म्हणे. ॥ ४२७ ॥ यास काय विरुद्ध। अद्वैत साधतां शुद्ध। प्रत्यक्ष पाहतां होते सिद्ध। भक्ति ईश्वराची. ॥ ४२८ ॥ चित्स्वरूप नव्हे इंद्रिय प्रत्यक्ष। तें बुद्धीस दिसे अपरोक्ष। इंद्रियांस कृष्ण अंबुजाक्ष। दिसे तैसीं चराचर तद्रूपें. ॥ ४२९ ॥ बुद्धीस ठाउका नट नर। स्त्रीवेष दृष्टीस दिसे शरीर। त्याच्या प्रतीतीकडे पाहती चतुर। तैसा साक्षिप्रत्यक्ष भक्त पाहती. ॥ ४३० ॥ तो ज्या त्या रूपें सगुण। कल्पूनि आपणातें आपण। दावितो जडत्वें परि स्वयें पूर्ण। चित्स्वरूप अखंड अनुभव तयाचा. ॥४३१॥ चिदात्मत्व अनुभवाकडे दृष्टी। दिसे इंद्रियांस भगवद्रूप सृष्टी। विना भगवत्कृपापीयूषवृष्टी। हें अचाट पीक सर्वथा पिकेना. ॥ ४३२ ॥ आतां योग ऐश्वर हें रूप माझें पाहें। म्हणोनि ज्ञान बोलोनि हें विज्ञान बोलताहे। ऐसी अर्जुनास दाखवी स्वपदवी हे। तो कृष्ण भगवान् नाम त्याचें. ॥ ४३३ ॥ आणि सर्वत्र 'भगवानुवाच'। आणि भगवद्गीता नाम साच। कृष्णगीता 'कृष्ण उवाच'। वेदव्यास ऐसें म्हणेना. ॥ ४३४ ॥ नामें सकलही त्याचीं। पदवी समान सर्वांची। परि गीतेंत प्रसिद्धि भगवन्नामाची। या प्रत्यक्षावगम धर्म्यज्ञानाच करितां. ॥ ४३५ ॥ भगवद्भक्त तेचि भागवत। भगवद्धर्म तेचि

---

१. अमृत.

धर्म भागवत । भगवच्छास्त्र तेंचि भागवत । भागवत पुराण अर्थ याच भगवद्गीतेचा. ॥ ४३६ ॥ उभे कौरव पांडव रणीं । मिळाली असे अणीस अणी । हे भगवद्गीता चक्रपाणी । उभयदळामध्यभागीं रथीं उपदेशितो. ॥ ४३७ ॥ सूत्रप्राय हे बोल । अर्थ भावार्थ अति खोल । धरूनिया गीतामृताची ओल[1] । निगमकल्पतरु लाविला श्रीभागवत ॥ ४३८ ॥ तें श्रीमद्भागवत । जेथें सर्वोत्कृष्ट धर्म भागवत । त्रिविध भगवद्भक्त भागवत । एकादश स्कंधीं बोलिले. ॥ ४३९ ॥ त्यांत उत्तम भागवत । बोलतां अनुभव तयाचा जो भागवतांत । तोचि या अध्यायांत भगवंत । प्रत्यक्षावगम धर्म्य म्हणोनि बोलतो. ॥ ४४० ॥ येथें स्थळोस्थळींही हेंच सूचवी । परि न वाखाणिती टीकाकार कवी । तो जों बुद्धीतें न शिकवी । तोंवरी बुद्धि न पावे या अनुभवा. ॥ ४४१ ॥ परि सर्वत्र हेच सूचना । करी उमजे तेच अर्जुना ! । हे गीता धर्म्यसंवादरचना । तरीच अष्टादशीं त्यातें बोलेल. ॥ ४४२ ॥ तुझा माझा हा संवाद । धर्म्य म्हणेल गोविंद । धर्म्यशब्दें प्रत्यक्षावगम ऐसें विशद । तो उमजला तरीच हे खूण दाखवी. ॥ ४४३ ॥ एवं प्रत्यक्ष हें भगवद्रूप । म्हणोनि हें ज्ञान धर्म्यस्वरूप । कीं नव्हे नुसतें बुद्धिगम्य अरूप । चित्स्वरूप कीं तें अतींद्रिय प्रत्यक्ष. ॥ ४४४ ॥ भजन जिज्ञासूचें परोक्ष । त्यास भगवत्प्रसादें निर्गुण अपरोक्ष । होतां मग हें पाहे प्रत्यक्ष । भगवद्रूप कृष्णरूप जेवीं. ॥ ४४५ ॥ तो उत्तम भागवत । म्हणोनि बोले भागवत । येथें सूत्रप्राय बोले भगवंत । हें ज्ञान त्या उत्तमाचें. ॥ ४४६ ॥ ऋषभ नामें भगवंत । अवतरला त्याचे पुत्र शत । त्यांत नव योगी परम भागवत । त्रिभुवनीं संचरती. ॥ ४४७ ॥ जनक राजा करी यज्ञ । त्या यज्ञमंडपीं ते सर्वज्ञ । नवही भागवतधर्मी अभिज्ञ । जनक पुसे भागवतधर्म तयांतें. ॥ ४४८ ॥ त्यांत कवि याचें उत्तर । देता जाला अति सादर । त्यांत आकाश वायु अग्नि इत्यादि चराचर । म्हणे हरिरूपें वंदावें. ॥ ४४९ ॥ एवं शेवटील श्लोकीं । कवि ऐसा बोलिला कीं । ऐसें अद्वैतबोधें भजतां लोकीं । भगवत्प्रबोध होय भागवतां तयांतें. ॥ ४५० ॥ तों राजा जनक पुसे तें वर्म । कीं कैसा तो भागवत ? कोण त्याचा धर्म ? । तों हरिनामा त्या धाकुटा यथाक्रम । उत्तम भागवत सांगे या श्लोकीं. ॥ ४५१ ॥

---

१. ओलावा, आधार.

श्रीमद्भागवत श्लोक—**सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ।**
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥

हरि म्हणे जनकराया ! । जो प्रत्यक्ष सर्वभूतांत या । पाहे आत्मया आपलिया । तोच भगवद्भाव. ॥ ४९२ ॥ आणि आपला आत्माच भगवंत । सर्वभूतें पाहें तयांत । हा म्हणावा उत्तम भागवत । शब्दार्थ तो हाचि इतका. ॥ ४९३ ॥ आतां भगवद्भावाची खूंण । ऐश्वर्यादि षड्गुण । ऋषि बोलती निपुण । त्याची खूण या श्लोकीं. ॥ ४९४ ॥

श्लोक—**ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।**
ज्ञानवैराग्ययोश्चेति षण्णां भग इति स्मृतिः ॥

समग्र म्हणजे सकल निःसीम । ऐसें समग्र ऐश्वर्य आणि धर्म । यश श्री ज्ञान वैराग्य यथाक्रम । समग्र निःसीम षड्गुण पाहें. ॥ ४९५ ॥ भग म्हणावें या सा गुणांतें । हे साही गुण असती जयातें । घडे श्रीभगवन्नाम हें तयातें । तो हाचि आत्मा जो हें ज्ञान जाणतो. ॥ ४९६ ॥ प्रस्तुत कवि धाकटा हरि म्हणताहे । कीं सर्वभूतीं आत्मयाचा भगवद्भाव पाहे । सर्वां भागवतांत तोचि लाहे । पदवी उत्तम भागवतपणाची. ॥ ४९७ ॥ त्यांत ऐश्वर्य सामर्थ्याचें नांव । जो अघटितघटनारचनाप्रभाव । कीं कांहीं नसोनि नाना भाव । स्वयेंचि सर्वेश्वर होतसे. ॥ ४९८ ॥ दृष्टीस जरी पट दिसे । बरें पाहतां तंतु मात्र असे । विश्व आत्मयांत समरसें । ये रीती अन्वयें पाहतां. ॥ ४९९ ॥ तथापि इंद्रियद्वारा मती । पावती मिथ्याभासप्रतीती । तो ऐश्वर्यभाव सर्वभूतीं । आत्मयाचा. ॥ ४१० ॥ परि हाही आत्मयाविण । अनुभव न घडे ऐसी खूण । जतन करावया म्हणे निपुण । कीं भूतें देखे आत्मा जो भगवंत त्यामाजीं. ॥ ४११ ॥ एवं नसोनि भूतें दिसतीं । हे अघटित घटना दिसे त्याच भूतीं । कीं चित्र विचित्र लेखकाची हस्तकौशल्यरीती । चित्रींच तथापि त्यास दिसतसे. ॥ ४१२ ॥ हे ईश्वरांची मायाकल्पना । परि जीवास अविद्येनें सत्यरचना । आणि राजविद्येनें तें विश्व नाना । भगवंताचें ऐश्वर्य दिसतसे. ॥ ४१३ ॥ तेचि जीव अविद्याकर्मबळें । पावती सुखदुःखरूपें विषमफळें । परि विद्यादृष्टीत हीं केवळें । भगवद्रूपेंचि दिसतीं. ॥ ४१४ ॥ तरी भगवंत षड्गुण । नव्हे निर्धर्म निर्गुण । सर्वसाक्षी सर्वज्ञ सगुण । विषम निर्दय केवीं म्हणावा ?

॥ ४६५ ॥ जो निर्दय आणि विषम । येथें म्हणावा मुख्य तो अधर्म । या वैषम्यनिर्दयत्वपरिहारें धर्म । गुण हा लागतो ईश्वरीं. ॥ ४६६ ॥ कीं जीवाची अनादि वासना । वासनेनें कर्मे घडती नाना । कर्मानुरूप फळ हेचि रचना । चराचराची. ॥ ४६७ ॥ नरक नाना दुष्ट योनी । हें सर्व भगवद्रूप म्हणोनी । विषम निर्दय नव्हे कीं कर्मे करोनी । फळें त्या कर्मांचीं पावती ते जीव. ॥ ४६८ ॥ स्वर्गभोग देवादि योनी । हेंही सर्व भगवद्रूप म्हणोनी । विषम निर्दय नव्हे कीं तैसीं सत्कर्मे करोनी । तीं फळें तेसमयीं ते पावले. ॥ ४६९ ॥ तेव्हां धर्मही हें चराचर । कीं चराचररूपेंचि समसदय ईश्वर । तथापि हा मायागुणही शरीर । ईश्वराचें. ॥ ४७० ॥ प्रत्यक्ष हें धर्मरूप । प्रकाशक त्याचें शुद्ध चित्स्वरूप । तो आत्मा अरूप । या भक्त ज्ञानियाचा. ॥ ४७१ ॥ कीं याचिया आत्मयाविण । न दिसे चराचराची खूण । अन्वयबोधीं हें वर्म निपुण । समजला. ॥ ४७२ ॥ तेव्हां साही गुणांचा भाव । आत्माच या भक्ताचा स्वयमेव । कीं समुद्रचि तें वैभव । जे आकार नाना तरंगांचे. ॥ ४७३ ॥ आतां ईश्वर देवाधिदेव । त्याचें स्वतःसिद्ध षड्गुण वैभव । त्याच्या प्रसादातें पावती मानव । ते स्वात्मयाचेच ते भाव देखती. ॥ ४७४ ॥ प्रस्तुत हा ऐसा धर्मगुण । गीतेंत पंचमीं याचें जालें विवरण । **'न कर्तृत्वं न कर्माणि'** इत्यादि श्लोकीं खूण । समसदयपणाची बोलिली. ॥ ४७५ ॥ कीं ईश्वर न करवी कांहीं हें निश्चित । जीव वासनेनें घडे सुकृत दुष्कृत । तदनुरूप त्यांचें कर्मसंचित । भोगिती फळें प्रारब्धेंकरोनी. ॥ ४७६ ॥ तें फळ हेंच चराचर । तें ईश्वराचें शरीर । फळरूप होऊनि समसदय ईश्वर । निरूपण पंचमीं हें जालें. ॥ ४७७ ॥ पंचमीं धर्म सगुण । नवमीं ऐश्वर्य दावी स्वयें षड्गुण । योग पाहें माझा म्हणतां खूण । यशाचीही दाखवी. ॥ ४७८ ॥ अघटितघटना हृषीकेश । पाहें म्हणे हेंचि यश । जो जें दावी स्वकौशल्यलेश । तो तें यशचि आपलें दावितो. ॥ ४७९ ॥ एवं हे चराचराची रचना । अघटित ईश्वराची घटना । तेव्हां जें विश्व दिसे नाना । हेंचि यश ईश्वराचें. ॥ ४८० ॥ चित्स्वरूपेंचि हेंही वैभव । प्रकाशलें तेव्हां हाही भाव । आत्मयाचाच पाहे भक्तराव । जो उत्तम भागवत भागवतीं बोलिला. ॥ ४८१ ॥ ऐसें ऐश्वर्य यश धर्म म्हणोनी । स्मृत्युक्त गुण हे तीनी । आतां श्री म्हणजे माया कीं याच भावेंकरोनी । विरुद्ध तीनी गोष्टी अविरुद्ध दाविल्या. ॥ ४८२ ॥ कीं मजमध्यें भूतें सकळ । तीं व्यापूनि त्यांत मी नाहीं केवळ । तींही मजमाजी नुसतीं निवळ । पाहें म्हणे हें रूप मायेचें.

॥ ४८३ ॥ मिथ्या सर्पातें व्यापी दोर। दोरीं असे सर्पआकार। दोर त्या सर्पीं नसे कीं तें सर्पशरीर। नसेच त्या रज्जूंत. ॥ ४८४ ॥ एवं रज्जूंत जैसा सर्प। ब्रह्मीं तैसें मायरूप। ते माया **श्री**रूपिणी आणि ब्रह्मस्वरूप। **श्री**धररूपें प्रकटते. ॥ ४८५ ॥ **श्री** यालागीं हृदयावरी। **श्री**धर साकाररूपें धरी। कीं **श्री** माया आणि मी ब्रह्म यापरी। समजोत लोक. ॥ ४८६ ॥ **श्री** आणि **श्री**धर। दोनी मायेचेच आकार। दोहीं देहीं निर्विकार। प्रकाशक ब्रह्म चिन्मात्र. ॥ ४८७ ॥ परि मी मायाच ऐसा [1]निश्चय। **श्री**रूपीं आणि आपण ब्रह्म ऐसा प्रत्यय। **श्री**धररूपी म्हणोनि अद्वय। तो सगुण ब्रह्म ते **श्री**रूपिणी माया म्हणावी. ॥ ४८८ ॥ तो **श्री**धर चित्स्वरूप। चराचर धरी मायारूप। रूप तितकें माया तो अरूप। चराचरचि तेव्हां श्रीही गुण चतुर्थ. ॥ ४८९ ॥ जों जों अधिक नारी नर। जों जों अधिकपशुभूचर। अधिक पक्षी अधिक तरुवर। तों तों अधिक तो श्रीमंत. ॥ ४९० ॥ भूमीं नाना धातु नाना तळीं जल। इत्यादि श्रीच सकळ। बहुत चुली बहुत अनल। तों तों श्रीमंत गृह तें. ॥४९१॥ गृहासी माडिया खिडकिया फार। श्रीमंताच्या घरींच वारा फार। उंच वर माडिया अपार। फार आकाश फार तों तों श्रीमंत. ॥ ४९२ ॥ बोलोनि काय बहुत। जे करिती मळे शेत। ते मलमूत्रयुक्त जें खत। द्रव्य वेंचूनि शकटावरी तें नेती. ॥ ४९३ ॥ श्रीमंत नव्हे तो कांहीं। नाम रूप पदार्थचि नाहीं। जे निःश्रीक म्हणविती घरीं तयांच्याही। जें असे तेंही **श्री**रूप. ॥ ४९४ ॥ अर्थ नासे तृष्णा उरे। तो **श्री** गेली म्हणोनि झुरे। कीं अधिक **श्री** देखोनि मरे। मत्सरें आणि मानी कीं आपण **श्री**हीन. ॥ ४९५ ॥ निःश्रीकता अमंगळ। ते हे तृष्णाच ओंगळ। तृष्णारहित जे सुमंगल। ते स्वयें **श्री**धर जो आत्मा चराचराचा. ॥ ४९६ ॥ हेंचि वर्णितां लांब। प्रस्तुतप्रसंगास होतो विलंब। एवं चराचरा या **श्री**रूपास अवलंब। चित्स्वरूप आत्मा भक्तांचा. ॥ ४९७ ॥ तो हा चतुर्थ गुण। आत्मयाचाच भाव पाहें निपुण। प्रत्यक्ष भगवद्रूप ऐसी खूण। सांपडली जया. ॥ ४९८ ॥ आतां पांचवा गुण ज्ञान। हें ज्ञान सत्त्ववृत्ति मायासत्ताहीन। आणि ज्ञान चित्स्वरूप [2]निरंजन। तें प्रकाशक या वृत्तिरूप सात्त्विक ज्ञानाचें. ॥ ४९९ ॥ भगशब्दें हे सहा गुण। त्या सहांमध्यें या ज्ञानाची लेखिली खूण। चित्स्वरूप आत्मा निर्गुण। या षड्गुणभगें युक्त तो भगवान्. ॥ ५०० ॥ ईश्वरत्व प्रत्यय। निर्गुणीं मायायोगें हा निर्णय। तयासि

१. ज्ञानरूप. २. परब्रह्मस्वरूप.

सृष्टिसंकल्पनिश्चय । साक्षित्व तेथूनी. ॥ ९०१ ॥ तो आपणास आपण ई-श्वर । कल्पी जैसा नट नर । नारीरूपें दावी चतुर । जननादि षड्भावांचा साक्षी कल्पी ऐसे षड्भाव. ॥ ९०२ ॥ प्रथम जननभाव दावितो । मग उ-पजोनि आहे या अस्तित्वभावा दाखवितो । मग **'वर्धते'** म्हणजे वृद्धि पा-वतो । मग **'परिणमते'** म्हणजे पावतो परिणाम. ॥ ९०३ ॥ वाढतां वाढतां राहिला । आतां वृद्धि पावणें नसे ज्याला । चतुर्थ भाव परिणाम त्याला । षड्भावांत बोलती. ॥ ९०४ ॥ मग **'अपक्षीयते'** । म्हणजे दंतादि अंगर-चना क्षयातें पावते । **'नश्यति'** म्हणजे तनु नासते। षड्भाव शास्त्रीं ये रीती. ॥ ९०५ ॥ साही ऐसे भाव । कल्पितो आपणास आपण देव । सा भावांचा साक्षी देवाधिदेव । ऐसे षड्भाव जाणणें हें ज्ञान. ॥ ९०६ ॥ या गुणांचें नांव ज्ञान । चित्स्वरूप याचें अधिष्ठान । तो आत्मा ज्यावरी भान । जननादि षड्भावांचें. ॥ ९०७ ॥ आपल्या आत्मयाचा ऐसा भाव । भागवत पाहे जो स्वयमेव । तो षड्गुण भगवान् देवाधिदेव ।एवं ज्ञानगुणही चराचर हेंचि तेव्हां. ॥ ९०८ ॥ कीं तो ज्ञानगुण षड्विकार । दावुनी जीवदृष्टीस साही प्रकार । तरंग होउनी उरे सागर । तैसा ज्ञानगुण निर्विकार तो उरतो. ॥ ९०९ ॥ भगवद्भाव उत्तम भागवत । आत्मयाचा पाहें म्हणे भागवतांत । त्यांत ज्ञानगुण ऐसा गीतेंतही या भगवंत । याच श्लोकीं उत्तरार्धीं बोलेल. ॥ ९१० ॥ उरला वैराग्यगुण एक । तोही या प्रकरणींच उत्तमश्लोक । बोलेल तो नवम श्लोक । जवळींच असे या नवमीं. ॥ ९११ ॥ कीं रचोनि इतकी रचना । इच्छा कोठें त्याला असेना । सुवर्णास अलंकार नाना । काय वाटती त्यावेसे ? ॥ ९१२ ॥ आपण [1]मायाविवर्ताचें [2]अधिष्ठान । हें अखंडित ज्याचें ज्ञान । करावें जड पटाचें परिधान । त्या ज्ञानतंतूस काय वाटेल ? ॥ ९१३ ॥ मृगजळीं सूर्य बुडे। हे गोष्टी काय घडे ? ।कीं समुद्र चाले तरंगांकडे । तृषित होऊनि पानार्थ ? ॥ ९१४ ॥ [3]शुक्तीवरी रजत भासे । शुक्ति धरील काय त्या रुप्याचे आशे । स्वयें स्त्रीवेष दावीतसे । काय इच्छील तिचा अंगसंग तो ? ॥ ९१५ ॥ ऐसें अनादि वैराग्य । शुकसनकादिक ज्याच्या अंशें सभाग्य । प्रपंचसत्यत्व हेंचि अभाग्य । बीज विषयवासनेचें. ॥ ९१६ ॥ मिथ्यात्व कनकीं नगाचें । तैसें मिथ्यात्व ईश्वरीं जगाचें । हेंचि बीज वैराग्याचें । तेव्हां चराचर त्याचें वैराग्यही. ॥ ९१७ ॥ कीं सत्य वाटे कामिनी । [4]ती भोगानु-

---

१. मायेचा भोंवरा. २. ठिकाण. ३. शिंपीवर रुप्याचा भास होतो. ४. भोगांचे इच्छेनें.

रागें आठवे मनीं । अनुराग विषयाचा म्हणोनी । विषयरूपचि लेखावा. ॥ ९१८ ॥ विषय जोंवरी न ये ध्यानीं । तो अनुराग त्याचा न उपजे मनीं । परि जो वाटे मिथ्या म्हणोनी । वैराग्य त्याचें त्यारूपें. ॥ ९१९ ॥ हाटांत जें देखिलें रजत । त्याचा अनुराग उपजे निश्चित । शुक्तिरजत मिथ्या अत्यंत । वैराग्य त्याचें. ॥ ९२० ॥ एवं सत्यरजतरूप प्रीती । असत्यरजतरूपें अप्रीती । तेव्हां चराचररूपें दिसे स्थिती । मिथ्या म्हणोनि वैराग्याची तयाच्या.॥९२१॥ मजमाजीं भूतें परि त्या भूतीं । मी नसें तींही मजमध्यें नसतीं । ऐसें प्रस्तुत बोले जगत्पती । हाचि वैराग्यगुणही तयाचा. ॥ ९२२ ॥ कीं रौप्य शुक्तींत दिसे । परि शुक्ति सत्य जे नाहींच त्या रजतीं नसे । आणि तें रजतही न वसे । कालत्रयीं शुक्तींत. ॥ ९२३ ॥ एवं जगचि वैराग्यगुण । कळे व्यापका आत्मयाकरितां त्याची खूण । तेव्हां आत्मयाचा भाव हाही तो निपुण । वैराग्य गुण भागवत उत्तम देखतो. ॥ ९२४ ॥ ऐसें श्रीमद्भागवत । बोलतां उत्तम भागवत । बोले परम धर्म भागवत । कीं तो प्रत्यक्ष भगवद्रूप पाहे हें विश्व. ॥ ९२५ ॥ त्या प्रत्यक्षाचें नांव योग ऐश्वर । आपलें रूप हें चराचर । पाहें म्हणोनि सर्वेश्वर । 'पश्य मे योगमैश्वरं' या चरणें म्हणतसे. ॥ ९२६ ॥ योग म्हणजे अघटित घटना । ऐश्वर म्हणजे मज ईश्वराचें हें रूप विश्व नाना । जो बोलतो या अनुभवाची रचना । भगवान्नाम तयाचें. ॥ ९२७ ॥ भगवद्रूप त्याचें। भगवद्रूपीं रूप सगुणाचें । रूप त्या सा ऐश्वर्यादिकांचें। भागवत-श्लोकें निरूपिलें. ॥ ९२८ ॥ हे गीता भगवद्गीता । 'भगवानुवाच' म्हणजे भगवान जाला बोलता । तो प्रत्यक्ष आपलें रूपचि हें पाहें म्हणे तत्त्वतां । एवं भगवद्रूप हें प्रत्यक्ष. ॥ ९२९ ॥ ऐसें पूर्वापरविचारेंकरोनी । हें चराचर भगवद्रूप म्हणोनी । युक्त्यनुभवें उपपादिलें परि मनीं । अर्जुन अद्यापि नाहीं समजला. ॥ ९३० ॥ तो म्हणे मायेनें विश्व केलें । तें याचें रूप केवीं झालें? । हें समाधान एकाच बोलें । श्रीकृष्ण या उत्तरार्धें करीतसे. ॥ ९३१ ॥

उत्तरार्ध—**भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ।**

मी भूतांचा धरणार । परि भूतीं नसें मी त्याचा विचार । ऐसा कीं हा नानाकार । बुद्धि माझी कल्पिते. ॥ ९३२ ॥ यांत प्रथमचरणीं पूर्वानुसंधान । दुसरिया चरणीं समाधान । त्या समाधानें होतां ज्ञान । चराचर भगवद्रूप म्हणोनी. ॥ ९३३ ॥ मी भूतें धरणार म्हणिजे म्यां जीं व्यापिलीं । तीं मजमाजीं बोलिलों तेव्हां म्यां धरिलीं । त्या भूतीं मी नसें कीं तुज कळलीं ।

१. प्रीति. २. बाजारांत, यात्रेंत.

नाहींतरी तीं भूतें मजमध्यें. ॥ ५३४ ॥ ऐसें रज्जुसर्पन्यायेंकरूनी । भूतें मजमाजीं म्हणोनी । हीं भूतें मायामात्र ऐसें यावरूनी । सिद्ध जालें. ॥५३५॥ ते माया म्हणोनि म्हणावी । त्याज्यांशांत जे गणावी । ते माझी कल्पना म्हणोनि जाणावी । योग ऐश्वररूप माझें हीं भूतें. ॥ ५३६ ॥ रामकृष्णाद्यवतारकल्पना जैसी । कल्पना चराचराची तैशी । तेव्हां माझी तनू न होती कैशी । हीं भूतें सकळही ?.॥ ५३७ ॥ या भावें म्हणे जगज्जीवन । कीं माझा आत्मा **'भूतभावन'** । आत्मा बुद्धि माझी म्हणे मधुसूदन । बुद्धि चिच्छक्ति कल्पनाशक्ति ईश्वराची. ॥ ५३८ ॥ ते भूतभावना अर्जुना ? । म्हणजे भूतांची करी भावना । भावना म्हणजे कल्पना । एवं शक्ति माझी भूतें कल्पिते हा अर्थ. ॥५३९॥ **'संभवाम्यात्ममायया'** । म्हणोनि चतुर्थाध्यायांत धनंजया । म्हणे माझी जी आत्ममाया । ती करोनि मी संभवतों. ॥ ५४० ॥ तेथेंचि कळलें अर्जुना । कीं अवतार मायाकल्पना । येथें चराचरभूतरचना । बुद्धि माझी कल्पिते म्हणतसे. ॥ ५४१ ॥ आणि पूर्वार्धी बोले सर्वेश्वर । कीं हा प्रत्यक्ष पाहें माझा योग ऐश्वर । भगवत्कृपापात्र चतुर । तत्त्व अर्जुन समजला. ॥ ५४२ ॥ कीं चित्स्वरूपीं चराचर । स्वशक्तीनें कल्पितो ईश्वर । तैसेचि कल्पितो अवतार । तेव्हां हा कमलपत्राक्ष तैसे प्रत्यक्षही. ॥ ५४३ ॥ आतां सामर्थ्य अवतारीं दिसे । तैसें चराचरीं कां नसे ? । हेंही अर्जुन अभिज्ञ न पुसे । तत्त्व कळलें. ॥ ५४४ ॥ कीं कृष्ण जरासंधभयें[1] पळे । तरी काय सामर्थ्यापासूनि तेव्हां चळे ? । तैसें चराचरीं असूनि न कळे । सामर्थ्य बाळपणीं जैसें कृष्णाचें. ॥ ५४५ ॥ शयन शेषपर्यंकीं करी । तो मुते बोळांतियावरी[2] । जो उदर विश्वाचें भरी । स्तन्यार्थ विश्वंभर तो रडे. ॥ ५४६ ॥ ब्रह्मांड भेदोनि गंगा आणी । गोपी न्हाणिती तो चक्रपाणी । पालथा घालोनि ओतिती पाणी । स्वपायांवरी विश्ववंद्यचरणातें. ॥ ५४७ ॥ अनादि बंध तोडी नामें । यशोदा त्यास बांधी दामें[3] । गोरसचौर्य आत्मारामें । करावें पळावें निर्भयें भिऊनियां. ॥ ५४८ ॥ इत्यादि बाललीला । करितां तया नवमेघनीला । देखतां गोपगोपिका मुलांमुलींला । काय समर्थ ईश्वर तो वाटे ? ॥ ५४९ ॥ सामर्थ्य तो चराचरीं । आच्छादोनि असे यापरी । सुखदुःख भोग तो शिरीं । स्थापिला प्रतिबिंबांश जीवाचिया. ॥ ५५० ॥ एवं जरी सामर्थ्य न दिसे । तरी चराचररूपें ईश्वर असे । हा अर्थ अर्जुना गवसे । म्हणतां **'ममात्मा भूतभावनः'** म्हणोनी. ॥ ५५१ ॥ आतां कल्पना समजावी कैसी ।

---

१. जरासंधानें द्वारकेवर हल्ला केला तेव्हां. २. बाळंतिणीच्या वस्त्रावर. ३. दांव्यानें.

अर्जुन पुसेल गोष्टी ऐसी । तरी पंचविध रीति बोलिली जैसी । ज्ञानविज्ञान-सहित सांगतां. ॥ ९९२ ॥ एक भूतें म्यां व्यापिलीं म्हणोनी । भूतें मजमाजीं यासहित दोनी । मी भूतीं नसें या सकट तीनी । भूतेंही मजमाजीं नसती चतुर्थ. ॥ ९९३ ॥ पांचवें माझें योग ऐश्वर । रूप पाहें म्हणे सर्वेश्वर । कल्पना चौं गोष्टींत समजोनि चतुर । पांचवें भगवद्रूपें दर्शन जगाचें. ॥ ९९४ ॥ म्हणोनिया अर्धाचा पूर्वचरण । तेथें या पूर्वोक्त रीतीचें विवरण । सूचवी जगद्वंद्यचरण । 'भूतभृन्न च भूतस्थो' म्हणोनी. ॥ ९९५ ॥ या पूर्वचरणें पूर्वानुसंधान । यानिमित्त कीं विश्व ईश्वरकल्पना याचें ज्ञान । होय ऐसें जगज्जीवन । सूचवोनी बोलतो. ॥ ९९६ ॥ कीं मनीं कल्पिलीं भूतें अनेक । त्यांत आंत बाहेर तो कल्पक । त्यावेगळा आकार कोण एक । कल्पिला जाय आणि कळे कल्पकातें. ॥ ९९७ ॥ तेव्हां ते कल्पिली रचना । कल्पकामाजींचि असे नाना । परि कल्पक त्यांत तो असेना । जैंसा सर्पी रज्जुकल्पना । मिथ्या म्हणोनी. ॥ ९९८ ॥ मिथ्या कल्पना जेधवां । कल्पकामाजीं नाहींच तेधवां । कीं जें मेलें जाळिलें तेंही मानवां । कल्पिता दिसे तरी काय आहे तें म्हणावें? ॥ ९९९ ॥ परि तें रूप कल्पकाचें । म्हणतां जनां न वाटे साचें । कीं पूर्वकर्मरचित जीवाचें । शरीर म्हणोनि कल्पना निराळी वाटते. ॥ ९६० ॥ परि जागृतीची जे कल्पना । तेचि स्वप्नीं स्वदेहरचना । ईश्वरासी तों देहचि असेना । कल्पनाचि त्याची त्याचे अवतार. ॥ ९६१ ॥ एवं कल्पनासामर्थ्य त्या कल्पकाचें । आणि रूपचि म्हणावें तयाचें । हें शरीर जरी कर्मांचें । तरी कर्म उपजे त्या कल्पनेचपासूनि. ॥ ९६२ ॥ कर्म करी कल्पूनी । ते कल्पना उपजे आदीं मनीं । पाहतां ऐसें विचारूनी । कल्पनाच देह जीवाचा. ॥ ९६३ ॥ दृष्टांतीं जीवकल्पना । ईश्वराचा तों देह कर्मांचा असेना । जे त्याच्या कल्पनेची रचना । तोचि देह ईश्वराचा. ॥ ९६४ ॥ प्रस्तुत 'ममात्मा भूतभावनः' म्हणोनी । म्हणतां इत्यादि भाव मनीं । अर्जुन समजला त्यावरूनी । चराचर भगवद्रूप तो पाहे. ॥ ९६५ ॥ कीं जननभाव कोठें कल्पितो । कोठें जन्मोनि आहे या अस्तित्वभावा दावितो । कोठें वृद्धि कल्पोनि वाढतो । कोठें परिणामें अपक्षयकल्पना दाखवी. ॥९६६॥ दंतकेशादिक्षीणता । कोठें बधिरता अंधता । इत्यादि अपक्षयता । कोठें कल्पितो. ॥ ९६७ ॥ कोठें भाव नश्यति । कल्पूनि दाखवी शवाकृती । कोठें भस्मादिरूप जगत्पती । कल्पी आपण आपणा. ॥ ९६८ ॥ प्रतिशरीरीं षड्भाव । या रीती कल्पी देव । ऐसीच ब्रह्मांडरचना स्वयमेव । उत्पत्तिनाश-

पर्यंत कल्पितो. ॥ **९६९** ॥ जें जैसें कल्पितो । तें तैसें लक्षितो । साक्षी ये रीती म्हणवितो । प्रत्यक्षज्ञान गुण भगवत्कल्पना. ॥ ९७० ॥ इतकें कल्पूनि कांहीं । मागुती त्याच्या स्वरूपीं नाहीं । इतकी रचना रचोनि तेही । नाहींच म्हणोनि जो जाणे. ॥ ९७१ ॥ हा शेवटील वैराग्यगुण । तोही समजला तो निपुण । आणि या साही गुणांची खूण । सर्वव्यापका आत्मयाच करितां. ॥ ९७२ ॥ तेव्हां आत्मा. आपुला । तोचि षड्गुण अनुभवें वाटला । भगवद्भाव आंगीं बाणला । एकसरां अर्जुनासी. ॥ ९७३ ॥ श्रीकृष्ण एक भगवंत । अर्जुन भगवद्भक्त भागवत । देशधडी जालें हें द्वैत । परम अद्वैत बिंबलें. ॥ ९७४ ॥ नवल भाग्याचा उदय । कृष्णचि जाला धनंजय । बोध बिंबला अद्वय । उभयत्र भगवद्भाव सारिखा. ॥ ९७५ ॥ मनीं पाहे अर्जुन । तों भगवद्रूप हें त्रिभुवन । अनुभवीं होऊनि तल्लीन । दचकला मागुती. ॥ ९७६ ॥ सर्व संशय निरसला । तों संदेह कांहीं एक उद्भवला । कीं विश्व आत्मा आपुला । परि यथास्थित विश्व मजला कळेना. ॥ ९७७ ॥ जितक्या जगाचा मज आठव । तितक्यांचा प्रतीतीस येतो भगवद्भाव । जें आठवे तें मी स्वयमेव । ऐसें वाटतें. ॥ ९७८ ॥ जें जें मातें न स्मरे । तेथें आत्मा मजसी मजला न स्फुरे । स्मरतां विश्व जें उरे । काय तेथें मी नसें? ॥ ९७९ ॥ आत्मा तरी अखंडित । हाचि वाटे भगवंत । जें न स्मरेही जग तयांत । हाचि आत्मा स्वयें नांदतो. ॥ ९८० ॥ परि ज्याचा न व्हे आठव । तेथें आत्मयाचा न व्हे अनुभव । आणि नाठवे तेंही स्ववैभव । तरी तें कोणे रीती जाणावें? ॥ ९८१ ॥ आणि मजमाजीं सर्व भूतें । तूं पाहें म्हणोनि मातें । **'मत्स्थानि सर्वभूतानि'** या चरणीं भगवंतें । आज्ञा केली कीं **'पश्य'** पाहें म्हणोनी. ॥ ९८२ ॥ ऐक्य मज आणि यास खरें । परि यास सर्वभूतें दिसती एकसरें । मज तें पाहणें नाकळे बरें । म्यां आपणांत कैसीं पाहावीं तीं सर्वे? ॥ ९८३ ॥ मज जें जितकें आठवतें । तितकेंचि तें प्रत्यास येतें । विश्व अपरिमित उरतें । तें कैसें मजमाजीं म्यां अवधारावें हें सर्व? ॥ ९८४ ॥ हें पुसों म्हणोनि । अर्जुन चिंती मनीं । तों अंतरसाक्षी तें समजोनि । ऐसीं आपणांत भूतें अवधारीं म्हणतो या श्लोकीं. ॥ ९८५ ॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

अगा! आकाशीं वायु नित्य वसे । तो सर्वत्र गगनीं असे । तोचि महाथोर

चंचल होतां गत्रसे । अनुभव येतसे हा वारा थोर होय म्हणोनी. ॥ ५८६ ॥ आणि नित्य सर्वत्र गगनीं समीर । तो न कळे कीं न स्पर्शे शरीर । जरी प्रत्यया नये वायु स्थिर । तरी आकाशीं आहेच तो म्हणावा. ॥ ५८७ ॥ महावायु तो जो वारा । चंचळ होऊनि लागतो शरीरा । तो गगनीं असे तैसाच पांडुकुमारा । नये प्रतीतीस तोही गगनींच आहे म्हणावा. ॥ ५८८ ॥ घरांत होतो उबारा । अणुमात्र नाहीं साच वाटे वारा । परि विंजणा[1] वस्त्र कांहीं हालतां शरीरा । लागे गगनीं असे म्हणोनी. ॥ ५८९ ॥ येविषयीं तों अर्जुना । संदेह नुपजो तुझ्या मना । या भावें आकाशवायुदृष्टांतरचना । पूर्वार्धीं ऐसी निरूपिली. ॥ ५९० ॥ आकाशीं द्विविध वायु जैसा । सर्वभूतें आपणांत तूं अवधारीं तैसा । कीं सर्वत्र वायु अनुभवा ये तरी कैसा । नाहीं म्हणावा कीं त्याच गगनीं तो असे. ॥ ५९१ ॥ **'यथा'** म्हणजे जैसें । **'तथा'** म्हणजे तैसें । दृष्टांतदार्ष्टांतीं समाधान ऐसें । शिष्यभक्तांचें जगद्गुरु करीतसे. ॥ ५९२॥ वारा नित्य सर्वत्र गगनांत । भूतेंही स्थितिकाळीं नित्य आत्मयांत । परि श्रवणेंद्रिया त्वगिंद्रिया प्रत्यया असे येत । जो चंचळ महावायु तोचि. ॥ ५९३ ॥ तथापि त्याच गगनीं । प्रत्यया न ये तोही वायु असे म्हणोनी। जन न जाणती या दृष्टांतें करोनी । सर्वभूतें तूं आपणांत अवधारीं. ॥ ५९४ ॥ कीं नभीं वायु तैसीं भूतें सर्वत्र आत्मयांत । जितकीं बुद्धीस विदित तीं प्रत्यया येती तयांत । तो जैसा महावायु प्रत्यया असे येत । श्रवणेंद्रिया त्वगिंद्रियासी. ॥ ५९५ ॥ प्रत्यया न येतां उरला । तो वायु त्याच गगनीं असे भरला । जैसें हें सत्य वाटतें तुजला । तैसीं तींही भूतें त्याच आत्मयांत हें समज. ॥ ५९६ ॥ स्मरतां प्रत्यया आलें चराचर । आणि उरलें जें नव्हे प्रत्ययगोचर । तेंही तूं आपणामाजीं अवधारीं ऐसें सर्वेश्वर । अप्रतीत जगीं ही अद्वैतधारणा बोलतसे. ॥ ५९७ ॥ कीं आत्मयाविण । न कळे जड जगाची खूण । परि तो निर्धर्म निर्गुण । प्रत्यया बुद्धीवाचून तों न ये. ॥ ५९८ ॥ काष्ठ गोंवरी[2] कैशा एकाविना । नुसता अग्नि दृष्टी दिसेना । बुद्धीविना प्रत्यया येईना । निर्धर्म आत्मा देहींही. ॥ ५९९ ॥ देहीं सर्वत्र आत्मा भरला । हें तों ठाउकें भलतियाला । परि जें जग तेव्हां नाठवे ज्याला । त्याच्या प्रत्ययांत तें तेव्हां असेना. ॥ ६०० ॥ आणि असोनि त्या अंगीं आपण । तेथें आपली आपणास न कळ खूण । तें स्मरतांचि अंग तोचि निपुण । तेथें जो आत्मा त्या आत्मयाच करितां तें जाणे. ॥ ६०१ ॥ एवं बुद्धि जेथें पावते । तेथेंचि आत्मयाची

१. विंझणा, पंखा. २. हरळीच्या मुळ्या.

प्रतीति येते । जड सृष्टि तेव्हां दिसते । तेथें तयाच आत्मयाकरितां गुरुमुखें. ॥ १०२ ॥ आत्मयांत भूतें सकळ । आत्मा भूतीं तरंगीं जैसें जळ । परि दृष्टि जेथें पाहे निवळ । तेथें जलतरंग दोनी दिसती. ॥ १०३ ॥ आणि जेथें न पावली दृष्टी । तेथेंही जळींच असे तरंगसृष्टी । प्रस्तुतीं कृपामृताची वृष्टी । याचि भावें या श्लोकीं होतसे. ॥ १०४ ॥ कीं सर्वगत आकाश पोकळ । त्यांत वायु सर्वत्र तो अकळ । कळतो जो महावायु म्हणिजे चंचळ । परि अकळही तोचि वायु त्याच आकाशीं. ॥ १०५ ॥ तैसा आत्मा सर्वगत । त्यांत भूतें सर्व एकसरें न कळती निश्चित । कळती तीं जेथपर्यंत । दिसे इंद्रियां अथवा स्मरे बुद्धी. ॥ १०६ ॥ बुद्धि इंद्रियें जाणती । तीं भूतें ज्या आत्मयांत असती । त्यावेगळीं प्रत्यया न येतां उरती । तींही तेंच त्याच आत्मयांत हा अर्थ. ॥ १०७ ॥ आत्मा नव्हे वेगळा । प्रकृतिभागही नव्हे निराळा । अन्योन्य जडभागा सकळा । भेद नसे. ॥ १०८ ॥ आत्मा सर्वत्र परि निर्धर्म । तों तों प्रत्यय जों जों बुद्धीचा आक्रम । न स्मरे तेंही स्थावरजंगम । अवधारीं आपणांत अर्जुना! म्हणतसे. ॥ १०९ ॥ **'तथा सर्वाणि भूतानि । मत्स्थानीत्युपधारय'** म्हणोनी । कृष्ण म्हणे कीं मजमाजीं म्हणजे ये रीतीकरोनी । तूं आपणांतही सर्वभूतें अवधारीं. ॥ ११० ॥ पूर्वीं **'मत्स्थानि सर्वभूतानि'** । म्हणे पाहें **'पश्य'** म्हणोनी । येथें **'तथा सर्वाणि भूतानि । मत्स्थानीत्युपधारय'** म्हणतसे. ॥ १११ ॥ कीं पूर्वीं मजमाजीं सर्वभूतें । पाहें म्हणोनि बोलिलों तूतें । तीं एकसरें तुझ्या बुद्धीतें । न आकळती हें सत्य. ॥ ११२ ॥ तरी आकाशीं द्विधा वायु दृष्टांतें । आपणाचि माजीं स्मृतें आणि अस्मृतें । आहेत सर्वही भूतें । अवधारीं ऐसें अर्जुना! ॥ ११३ ॥ अगा! मजशीं ऐक्य जालें । परि माझें ईश्वरत्व तुज नाहीं आलें । म्हणोनि सर्वसाक्षित्व राहिलें । त्यामुळें तुज हा संदेह. ॥ ११४ ॥ अगा! राजा दरिद्रता हरी । सभाग्य आपणासम करी । तोही तैसाच जाला परी । समग्र पृथ्वीशासन तें तों नये तयातें. ॥ ११५ ॥ आणि जरी नये तें शासन । तैसाच जाला सभाग्य सधन । परि तें करावें त्याणें जतन । तैसा भगवद्भाव हा ध्यावा तुवां सर्वदा. ॥ ११६ ॥ त्या ध्यानीं सर्वही भूतें । न आठवती जरी तूतें । या भावें आकाशवायुदृष्टांतें । **'तथा' 'उपधारय'** म्हणोनि[१] बोलिलें हें ध्यान. ॥ ११७ ॥ भगवद्वाक्यार्थ ये रीती । परि इतर टीकाकार

---

१. पूर्ण, भागरहित.

ऐसें न बोलती । पूर्वी ज्ञान बोलिला त्यास म्हणती । **'यथाकाश–'** हा दृष्टांत. ॥ ११८ ॥ तरी मागिल्या तिन्ही गोष्टी । पाहतां तिकडे देऊनि दृष्टी । वृथा जाले सर्वही कष्टी । दृष्टांत त्या तिहीं गोष्टींस लागेना. ॥ ११९ ॥ मजमाजीं सर्वभूतें । जरी इतकेंचि बोलिलें असतें । तरी या दृष्टांतास येतें । साम्य कांहींसें. ॥ १२० ॥ कीं मजमाजीं म्हणतो तो अव्यक्तमूर्ती सत्य । आणि भूतें जरी जडें असत्य । तरी दृष्टांत एकदेशी घ्यावा अगत्य । कीं आकाशीं वायु तैसीं भूतें त्यामाजीं. ॥ १२१ ॥ परि प्रस्तुतीं म्हणतो कीं मी नसें त्या भूतीं । आणि तीं भूतेंही मजमाजीं नसती । तैसा आकाश वायूंत नसे ये रीती । आणि वायुही नसे नभीं तरी हें घडे. ॥ १२२ ॥ आकाश जड पोकळ । ब्रह्म चिन्मात्र इंद्रियां अकळ । तथापि आकाशवत्सर्वगत केवळ । श्रुति एकदेशी दृष्टांत बोलती. ॥ १२३ ॥ येथें **गी**तेंतही त्रयोदशीं । आकाशासारिखें व्यापक म्हणोनि एकदेशी । व्यापकत्वीं दृष्टांत उपदेशी । श्रीकृष्ण. ॥ १२४ ॥ परि मजमाजीं भूतें असती । आणि मी नसें त्या भूतीं । तींही मजमाजीं नसती म्हणे **श्री**पती । यास दृष्टांत आकाशीं वायु कैंवी घडे? ॥ १२५ ॥ आकाशीं वायु असे । वायूंतही आकाश वसे । आतां सादृश्य कैंवी गवसे? । दृष्टांतीं आणि दार्ष्टांतिकीं. ॥ १२६ ॥ आतां **'भूतभृन्न च भूतस्थो'** या चरणीं । पूर्वश्लोकीं भूतें धरोनि भूतीं नसे म्हणे **चक्र**पाणी । इतकिया दृष्टांतीं वाणी । योजावी तरी योजेना. ॥ १२७ ॥ कीं आकाश वायूतें धरी । आणि असेच त्या समीरीं । गगन समीरीं नसे यापरी । न घडे तो न लगे दृष्टांत. ॥ १२८ ॥ आतां वारा चळेना गगनीं । तेव्हां गगनच असे वारा नसे म्हणोनी । दृष्टांत साधिला ऐसा दांत चावुनी । तरीही व्यर्थ. ॥ १२९ ॥ कीं चळेना वायु जेधवां । वारा नसे जरी म्हणावा तेधवां । तरी विंजणा हालतां मानवां । त्वचेस लागे तो उपजला कोठोनी? ॥१३०॥ जें तरंगरूप जळ । तेंचि जळ म्हणावें अचळ । जो स्थिर तोचि चंचळ । वारा गगनीं सर्वदा. ॥ १३१ ॥ आणि **'यथाकाशस्थितो नित्यं'** म्हणोनी । अचळ वायुही या नित्यशब्दें करोनी । घेतला कीं न हाले तेधवांही गगनीं । नित्य असे. ॥ १३२ ॥ अचळ वारा न दिसे । तथापि तो गगनीं असे । भूतग्राम ऐसा वसे । तरी न म्हणावें कीं भूतें हीं नसती मजमाजीं ॥ १३३ ॥ अकळ वायु गगनीं अचळ । तैसीं भूतें ब्रह्मीं म्हणतो सकळ । ऐसें म्हणावें तरी जो नव्हे चंचळ । असेच गगन त्यांत तोही गगनीं असेच ॥ १३४ ॥ कीं भूतें जैशीं त्यांत असती । तो नसे म्हणावा

तैसा भूतीं । अचळ वायु न कळे तरी व्यापकगती । आकाशचि असे त्या वायूंत. ॥ ६३५ ॥ तेव्हां मी भूतीं नसें म्हणे ऐसें । हें दृष्टांतीं साधेल कैसें? । कीं ब्रह्मीं भूतांचें असणें जैसें । तैसें अकळ वायूचें असणें आकाशीं. ॥६३६॥ आतां भूतेंही म्हणे मजमाजीं नसती । यास अकळ वायु गगनीं नाहीं न म्हणवे ये रीती । कीं जरी ब्रह्मीं भूतांची वसती । जो अचळ न कळे त्या वायूसारिखीं लेखिलीं. ॥ ६३७ ॥ म्हणे भूतें हीं मजमाजीं नसती । तेव्हां अकळ वायु गगनीं नसे जरी ये रीती । तरी अवश्य दृष्टांत हा मानिती । संत विवेकी शोधक. ॥ ६३८ ॥ दोहींपरि अघटित । पूर्वोक्त ज्ञानास न लागे हा दृष्टांत । कीं स्मृता अस्मृता भूतांचें अद्वैत । ऐसें अवधारीं म्हणजे ध्यान करीं म्हणतसे. ॥ ६३९ ॥ आणि वायूचीं रूपें दोनीं । ये स्थळीं निरर्थक काय म्हणोनी? । **'यथाकाशस्थितो नित्यं'** इतकिया वचनीं । निर्वाह दृष्टांताचा होतसे. ॥ ६४० ॥ **'सर्वत्रगो'** आणि **'महान्'** म्हणोनी । रूपें वायूचीं दोनी । आणि दृष्टांत पूर्वोक्तास लागेना यावरूनी । स्पष्ट भगवद्भाव हा नव्हे ऐसा श्लोकचि दावितो. ॥ ६४१ ॥ सर्वभूतीं आत्मा ध्यावा । हा बोध ज्यास असेल ठावा । त्यालाचि हा संदेहही उठावा । कीं ध्यातां उरलीं तीं आत्मयांत कैसीं पहावीं? ॥ ६४२ ॥ क्षुधा असेल ज्याला । अन्नाची इच्छा उपजेल त्याला । त्याच वरी कृपा अन्नदातयाला । उपजेल अन्न द्यावयाची. ॥ ६४३ ॥ त्यालाच त्या अन्नाचा रस । अनुभवास येतो सुरस । तैसा हा अर्थही जगन्निवास । सर्वभूतीं भगवद्भाव ज्यास त्यालाचि देतसे. ॥ ६४४ ॥ या अनुभवाचा ज्यांस ठाव नसे । ते हा अर्थ काढितील कैसे? । लागेचि ना तेथें? जैसे तैसे । गेले निर्वाहसा करूनियां. ॥ ६४५ ॥ षष्ठीं **'सर्वभूतस्थमात्मानं'** या श्लोकांत । सर्वभूतीं आत्मा सर्वभूतें आत्मयांत । तेथें सर्वघटीं जळ सर्वघट जळांत । बुडाले या दृष्टांतें हा अर्थ साधिती. ॥ ६४६ ॥ ऐसें द्वैत उरवूनि बोलती । प्रस्तुतीं मजमाजीं भूतें मी नसें भूतीं । येथें फेंस आणिला दृष्टांतीं । असे भगवद्भाव भूतीं तरी हें कळे. ॥ ६४७ ॥ प्रस्तुतीं त्या टीकेचें भक्त अत्यंत । ते येथें म्हणतील एकदेशी दृष्टांत । तरी आकाश जड चित्स्वरूप भगवंत । तेथें एकदेशी म्हणावें. ॥ ६४८ ॥ भूतें मजमाजीं त्या भूतीं । मी नसें तींही मजमाजीं नसती । असोनि नसणें इतकी तों रीती । दृष्टांताची मिळावी. ॥ ६४९॥ जळामाजीं फेंस दिसे । परि फेसीं जळ नसे । जिहीं इतकें तरी साधिलें तेचि कैसे । हा दृष्टांत तिकडे लाविती? ॥ ६५० ॥ वायु आकाशीं वसे । परि आकाश वायूंत नसे । ऐसा फेंस जळासारिखाही न दिसे । दृष्टांत येथें. ॥६५१॥

भूतें असोनि नसती । हें मुख्य साधितो येथें यदुपती । तो नवरा सोडोनि मिरवती । वराडी व्यर्थ? ॥ ६५२ ॥ अधिष्ठान असे सत्य । विवर्त भासे असत्य । ऐसे कोटि दृष्टांत सोडोनि अगत्य । काय हाच दृष्टांत सर्वज्ञास आठवला? ॥ ६५३ ॥ भगवंत म्हणा वेडा । अथवा त्या टीकेची श्रद्धा सोडा । गीता सोडोनि व्यर्थ पवाडा । गोष्टींचा वाचणें तरी वाचा गोड गोष्टी. ॥ ६५४ ॥ गीता[1] जाते पश्चिमेकडे । टीका चढे पूर्वदिशापर्वताच्ने कडे । दोहींस हात लाविती बापुडे । अर्थ सांपडे केंवी तयां? ॥ ६५५ ॥ दृष्टांत लागला कोणे अंशीं । कीं उरल्या साम्यास मानावें एकदेशी । सर्वज्ञ तत्त्व उपदेशी । दृष्टांत अयोग्य तो कां बोलेल? ॥ ६५६ ॥ भूतें मजमाजीं असती । हे प्रथम गोष्टी बोले श्रीपती । आकाशीं वायु ये रीती । दृष्टांत एके गोष्टीस मानावा. ॥ ६५७ ॥ तरी भूतें आपणांत नसती । हें सिद्ध करावया आदीं म्हणे असती । वरास लावाया आदीं आणिती । हरिद्रा जैसी. ॥ ६५८ ॥ दवडोनियां त्या वरा । हरिद्राच म्हणती नवरा । अंतरपट म्हणती धरा । नवरी आणि हरिद्रा यांमाजीं. ॥६५९॥ भूतें असोनि नसती । हें सिद्ध करितो श्रीपती । या दृष्टांतें भूतें निश्चित असती । बळकटी होती या गोष्टीची. ॥ ६६० ॥ मी त्यांत नाहीं । तीं मजमाजीं नसती कांहीं । उडाल्या या गोष्टी दोनीही । प्रथम गोष्टीस दृष्टांत हा देतां. ॥ ६६१ ॥ नसे गगन पवनीं । नसेच पवनही गगनीं । हें न घडे तेव्हां गेलिया उडोनी । दोनीही गोष्टी या दृष्टांतें. ॥ ६६२ ॥ भगवंतीं असावीं भूतें । भूतीं नसावें भगवंतें । पुन्हां भूतेंही भगवंतीं नसती ऐशा दृष्टांतें । हा अर्थ साधावा. ॥ ६६३ ॥ येथें तत्त्व दावूनी अपरोक्ष । भगवद्रूप दावी प्रत्यक्ष । हातींच्या कांकणास कोण दक्ष । अपेक्षी आरसा? ॥ ६६४ ॥ म्हणोनि विना दृष्टांत । तत्त्व दावी भगवंत । अपरोक्षानुभवासही अशक्य अत्यंत । तेविषयीं दृष्टांत हा दावी. ॥ ६६५ ॥ कीं जाला अपरोक्ष साक्षात्कार । भगवद्रूप देखे चराचर । तरी अशेष विश्व निरंतर । न दिसे तया. ॥ ६६६ ॥ एक ईश्वरच हें जाणे । ज्ञानियास सर्वही ब्रह्म इतकेंच बाणे । विश्वरूप दावितां पार्थासि म्हणे । कीं या दृष्टीनें मातें पाहों न शकसी. ॥ ६६७ ॥ देऊनियां दिव्य दृष्टी । मग एकदांचि दाविली सर्व सृष्टी । अपरोक्ष उपदेश करुणावृष्टी । असोनि दिव्यदृष्टींच दाविलें विश्वरूप. ॥ ६६८ ॥ पावला अपरोक्ष साक्षात्कार पार्थ । प्रथम श्लोकीं विश्वरूपी हा स्पष्ट अर्थ । या नवमीं तो समर्थ । पाहें पाहें म्हण-

[1] वामनपंडितांनी इतर टीकाकारांवर बऱ्याच ठिकाणीं असा कोरडा उडविला आहे.

तसे. ॥ १६९ ॥ राजा सकळ विद्यांचा । राजा सकळ गुह्यांचा । ज्ञानविज्ञान-सहित सांगतों म्हणे स्वत्राचा । आणि पाहें म्हणोनि साक्षात्कारें दाखवी तें. ॥ १७० ॥ एवं अपरोक्षसंपन्न पार्थ । तथापि विश्वरूप या दृष्टीं न दिसे यथार्थ । म्हणोनि सिद्ध होतो अर्थ । कीं न स्मरती तींही भूतें ये रीती पाहें आपणांत ॥ १७१ ॥ कीं चंचळ आणि अचळ । द्विविधही एकाच गगनीं अनिल । तैसीं स्मृतें अस्मृतें भूतें सकळ । एकाच निर्धर्मी स्वात्मयांत अवधारीं. ॥ १७२ ॥ कीं अवधारणें बुद्धीचे शिरीं । परि तें तेजें दृष्टी प्रकाशे यापरी । आत्मयाकरितां सचेतन होतां चराचरीं । तो आत्मा पवन गगनीं ये रीती. ॥१७३॥ सूर्यतेजें प्रकाश पावे । ते दृष्टी तेजावरी धांवे । धांवतां तेज उरलें न म्हणवे । वेगळें तेज सूर्याचें. ॥ १७४ ॥ तेजांत जेथवरी धांवे दृष्टी । तेथवरी देखे त्या तेजें प्रकाशली सृष्टी । पुढें तेंच तेज तेचि सृष्टी न दिसतां कष्टी । तदर्थ कोण होय? ॥ १७५ ॥ आत्मयानें प्रकाशली बुद्धिदृष्टी । आत्मप्रकाशित चित्तें स्मरे त्यांत सृष्टी । उरला आत्मा आणि सृष्टि तदर्थ कष्टी । न कळे आत्मत्वें म्हणोनि कां व्हावें? ॥ १७६ ॥ तोचि आत्मा उरला जैसें गगन । तेचि सृष्टी उरली गगनीं जैसा पवन । सर्वत्र आपण सर्व आपणांत ऐसें समाधान । या श्लोकीं केलें ऐसें अवधारीं म्हणोनी. ॥ १७७ ॥ उदंड टीकाकार जाले समर्थ । परि या श्लोकांचा अचुंबितार्थ[1] । या 'यथार्थदीपिके'नेंच प्रगटला यथार्थ । अनन्यशरणगतिप्रतापें. ॥ १७८ ॥ मंगलाचरणीं क्षुद्रदेवता । त्यांस कठीण अत्यंत हे गीता । विना गीताकार अनंता । कोण टीकाकार टीका करील गीतेची? ॥ १७९ ॥ अद्वैताच्या आश्रयें । ब्रह्मचि सर्वदेवता या निश्चयें । आम्हीं ज्ञानी जगद्गुरु स्वयें । ऐसें मानूनि वर्म चुकले भक्तीचें. ॥ १८० ॥ ब्रह्म सर्वत्र सम । तरी घरची बटिक काय नव्हे ब्रह्म? । कां तीचें श्रवणकीर्तन न करावें परम? । कां मंगलाचरण तीचें करूं नये? ॥ १८१ ॥ देवता विघ्न हरी । तेचि मंगलाचरणीं वंदावी कां परी? । एवं ब्रह्म सर्व परि उंच नीच पायरी । एकएकाची उपाधिभेदें. ॥ १८२ ॥ एवं ईश्वरोपाधियुक्त निर्गुण । तेंचि एक भजावें सगुण । हे न कळोनि गीताप्रोक्त खूण । तक्र पिती दुग्ध म्हणोनी. ॥ १८३ ॥ असोत त्या गोष्टी । अनन्यभक्तीवांचूनि दृष्टी । गीतार्थ न पडे वृथा कष्टी । टीकाकार जाले कितीएक. ॥ १८४ ॥ हें परटीकादूषण । आणि स्वटीकाभूषण । अभिमानें किंवा न्यायें हें विचक्षण । पाहोत पूर्ण दीर्घदृष्टी.

---

१. अननुभूत किंवा न समजलेला अर्थ. ह्या ओंवींत वामनपंडितांनीं आपल्या कृतीचा अभिमान—गर्व नव्हे—व्यक्त केला आहे.

॥ ६८५ ॥ न करितां मृषा जडाचें रूप । न कळे सत्य चित्स्वरूप । शास्त्रविरुद्ध पक्ष विरूप । न दूषितां नव्हे रूप अर्था यथार्थाचें. ॥ ६८६ ॥ श्रोते हा सिद्धांत यथार्थ । परिसोनि तेही देखतील अर्थ । त्या बाधितार्थी श्रद्धा धरोनि व्यर्थ । च्यवतील तत्त्वापासूनी. ॥ ६८७ ॥ यालागीं ते अर्थ बाधित । अगत्यस्थळीं दूषूनि हा अबाधित । अर्थ बोलावा लागतो हेंही भगवंत । कां ऐसें करितो तो जाणे. ॥ ६८८ ॥ सिद्धांत होतां यथार्थ । सहज उडती कित्येक अर्थ । ते दूषूनि कां व्यर्थ ग्रंथ । अत्यंत वाढवावा ? ॥ ६८९ ॥ येथवरी राजविद्याप्रकरण । प्रत्यक्ष हें भगवद्रूप ऐसें विवरण । जालें आतां जगद्वंद्यचरण । काय बोलेल तें पहावें. ॥ ६९० ॥ सा श्लोक या अध्यायांत । बोलिला ऐसे भगवंत । राजविद्याप्रसंग येथपर्यंत । अनन्यशरणें वाखाणिला. ॥ ६९१ ॥ यांत प्रथम श्लोक दोनी । राजविद्या अत्यंत थोर ते सांगतों म्हणोनी । तिसरिया श्लोकीं ज्या धर्मावांचूनी । हें प्राप्त नव्हे वर्णिलें त्याचे अश्रद्दधान. ॥ ६९२ ॥ पुढें जें राजगुह्य होतें बोलणें । तें दों श्लोकीं नारायणें । बोलोनि ये रीती आपणातें अवधारणें । म्हणोनि या एका श्लोकीं तें निरूपिलें. ॥ ६९३ ॥ ऐसी षट्श्लोकीं बोलिली । प्रत्यक्षही भगवद्रूपाची किल्ली । प्रकट करितां नाहीं उरली । उरी कांहीं गुह्य बोधाची यापुढें. ॥ ६९४ ॥ अशेष गेलें द्वैत । बिंबलें परम अद्वैत । प्रत्यक्ष जडभागही भगवंत । ऐसें बिंबलें. ॥ ६९५ ॥ प्रत्यक्षही हें भगवद्रूप देखे अर्जुन । याचें नांव पूर्वीं बोलिलें विज्ञान । आणि भूतें दिसोनि नसती हें ज्ञान । या ज्ञानेंचि विज्ञान हें होय. ॥ ६९६ ॥ म्हणोनि विज्ञानासहित । ज्ञान सांगेन म्हणे भगवंत । आणि या ज्ञानाचें साधन अत्यंत । भागवतधर्म. ॥ ६९७ ॥ म्हणोन याच्या धर्माचे अश्रद्दधान । तें न पावोनि मातें श्रद्धाहीन । मृत्युसंसारमार्गी बहुत जन । परतले ऐसें मागें बोलिला. ॥ ६९८ ॥ एवं विना भगवद्भजन । सर्वथा नव्हे आत्मज्ञान । त्यांत कोणी मुमुक्षु जन । आत्मा कळतां सगुण सोडिती. ॥ ६९९ ॥ ते क्लेश अधिकही पावले । तथापि मुक्त तों जाले । जे ज्ञानें सगुण भजों लागले । ते पावले या भगवत्प्रबोधातें. ॥ ७०० ॥ परंतु होय आत्मज्ञान । त्यास साधन भगवद्भजन । त्या भगवद्भजनीं अश्रद्दधान । ते पढतमूर्ख संसारीं परतले. ॥ ७०१ ॥ मातें न पावोनि ते परतले । ऐसें मागें श्रीकृष्ण बोले । एवं आत्मस्वरूप कृष्णास पावले । ते न परतले कदापि. ॥ ७०२ ॥ त्यांत कोणीं धरिलें निर्गुण । कोणी निर्गुणज्ञानें भजती सगुण । परि स्वरूपातें पावले ते निपुण । न परतती कोणीही. ॥ ७०३ ॥ हा सिद्धांत जाला केवळ । परंतु एका संशयाचें हें स्थळ । कीं प्राप्त होतां प्रल-

यकाळ । ब्रह्मीं मिळे सर्वेही. ॥ ७०४ ॥ कीं सूर्य शोषी थिल्लरजळें । त्यांत सूर्याचीं प्रतिबिंबें केवळें । तीं सूर्यांत मिळती सकळें । प्रलयीं ब्रह्मीं उपाधि-सहित ये रीती. ॥ ७०५ ॥ प्रळयीं उपाधिसहित जीव । मिळती उरे निर्गुण स्वयमेव । तेथोनि पुनः होतसे उद्भव । उपाधीचा आणि जीवाचा. ॥ ७०६ ॥ ऐसे ब्रह्मीं पावले। ते जेव्हां परतले। तेव्हां हेही जरी ज्ञानी भले । तरी परततीच ऐसें म्हणावें.॥७०७॥ ते कां परतती ब्रह्म पावोनी । हे कां न येती परतोनी । ज्ञानी आणि अज्ञानी । ब्रह्मचि होती प्रलयीं दोघेही. ॥७०८॥ एवंच न पावले मातें । ते परतले ऐसें बोलिलें भगवंतें । तरी तेही प्रलयीं तयातें । पावती निश्चित. ॥ ७०९ ॥ जे पावले ते न परतती । तरी हेही प्रलयकाळीं पावती । जरी हे पावोनि परतती मागुती । तरी तेही परतती म्हणावें. ॥ ७१० ॥ पावोनिही परतणें घडे । तेव्हां भगवंत बोलिला तें उडे । कीं मातें न पावोनि पडे । मृत्युसंसारमार्गीत. ॥ ७११ ॥ न पावतां जेव्हां परतले । तेव्हां न पर-तती जे पावले । ऐसें दाटूनि भगवंत बोले । येथें उडाली ते गोष्टी. ॥७१२॥ प्रलयीं ब्रह्म केवळ । पावती जीव सकळ । तेव्हां हे गोष्टी निष्फळ। कीं पावले ते न परतती. ॥ ७१३ ॥ एवं पूर्वपक्ष सबळ । हा परि हरूं पाहे मेघनीळ । प्रलयसृष्टिप्रकरणारंभमूळ । पूर्वपक्ष ऐसा वर्णिला. ॥ ७१४ ॥ कीं प्रलयीं सर्वेही ब्रह्मस्वरूपीं । मिळती हें अन्यथा नव्हे कदापी । पुनरावृत्तिहेतु तथापि । त्यास असे तो बोलतो या श्लोकीं. ॥ ७१५ ॥

सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

अगा कुंतीसुता ! माझी प्रकृती। जी करी प्रलयोत्पत्ती । हीं भूतें तीतें पावती। कल्पक्षयीं याकरितां पुनर्भव. ॥ ७१६ ॥ कल्पाचिया आदिकाळीं तया । पुनः निर्मितों धनंजया ! । मज न पावोनियां जया । प्रलयीं पावणें प्रकृतीतें. ॥७१७॥ माझिया प्रकृतीतें पावती । या गोष्टींत संशयनिवृत्ती । कीं बीजांतूनि वृक्ष ये रीती । सृष्टिकाळीं उपजे प्रकृतीपासूनि हा प्रपंच. ॥ ७१८ ॥ तेव्हां उपाधि प्रकटती । जळें होतां प्रतिबिंबें दिसती । जे प्रकृतीतें पावती । त्यांतें निर्मितों या भावें म्हणतसे. ॥ ७१९ ॥ ज्ञान नाहीं तयांतें । हें सूचवी म्हणतां सर्व-भूतें । प्रकृतींत मिळती ते कीं जयांतें । अभिमान देहा जडाचा. ॥ ७२० ॥ आत्मा जिहीं ओळखिला । जडभाग मिथ्या लेखिला। तिहीं तो नाहींच देखिला।

---

१. डबक्यांतील पाणी.

प्रलयकाळ. ॥ ७२१ ॥ ते कां प्रकृतीतें पावती । ज्यांस बाणली ब्रह्मात्मत्वं-स्थिती । त्यांची गणना नसे सर्वभूतीं । मातें पावले ते ऐसे. ॥ ७२२ ॥ एवं सकळ वेदवेदांत । बोलती हाच सिद्धांत । कीं ब्रह्म पावले जे भाग्यवंत । ते प्रलयीं न मिळती प्रकृतीतें. ॥ ७२३ ॥ उपाधि पावले ज्या प्रकृतीतें । ब्रह्मीं लय बोलिजेतो तीतें । पुन्हा उदय बोलिला ते गुणवतीतें । सृष्टिकाळीं.॥७२४॥ प्रलयकाळीं जें जें गिळी । सृष्टिकाळीं तें तें उगळी। लय पावती जैशीं तैशींच सगळीं । सृष्टिकाळीं प्रकटती. ॥ ७२५ ॥ प्रलयकाळीं मिळालीं तीतें । तीं सर्वही म्हणावीं भूतें । प्राकृतें पावती प्रकृतीतें । ब्रह्म पावले ते ब्रह्मज्ञ.॥७२६॥ ज्यांची अविद्या गेली । जिहीं ब्रह्मीं ब्रह्ममय बुद्धि केली । ब्रह्मींच ते त्यांची निमाली । बुद्धिलहरी आनंदसिंधूंत. ॥ ७२७ ॥ जोंवरी प्रारब्धाचा वारा । तों बुद्धिवृत्ति जडतरंगाकारा । होत होत्या तो सरतां सारा । लहरी बुद्धीचीही निमाली. ॥ ७२८ ॥ बुद्धीच जीवोपाधी । ते ब्रह्मीं मिळे प्रलयाआधीं । तरी चिदंशास मग कधीं । प्राप्त नव्हे जीवत्व. ॥ ७२९ ॥ दिनांतीं लय मृगजळाचा किरणीं । प्रकृतीऐसी मिळे निर्गुणीं । ज्याचा उपाधि तिच्या त्रिगुणीं । न मिळे तो सृष्टिकाळीं उपजेना. ॥ ७३० ॥ घट फुटे नासे जल । त्यांत कैसें प्रति-बिंबे सूर्यमंडळ । अविद्या नाशितां अविद्यामूळ । उपाधि नासे न मिळे प्रलयीं प्रकृतीतें. ॥ ७३१ ॥ अविद्या आहे ज्यांची । प्रलयीं प्रकृतीतें बुद्धि त्यांची । मिळे तें सृष्टिकाळीं प्रकटतां जीवाची । जीवदशा मागुतीं प्रगटते. ॥ ७३२ ॥ त्यांस भूतें शरीरें । आत्मा वाटती चराचरें । म्हणोनि त्यांस एकसरें । सकट भूतें म्हणे श्रीकृष्ण. ॥ ७३३ ॥ आतां क्रममुक्ति ज्यांला । प्रलय-काळीं ब्रह्मयासह मोक्ष त्याला । परि अविद्यानिवृत्ति करूनि असे जाला । ब्रह्मात्मबोध. ॥ ७३४ ॥ जीवोपाधि ब्रह्मयाचा । ब्रह्मीं मिळे तैसाच त्यांचा । प्रकृतींत न मिळे ज्यांला साचा । आत्मा उपाधि मृषा जडावेगळा विदित. ॥ ७३५ ॥ एवं च अज्ञानयुक्त उरले ते प्रकृतीतें पा-वले । तेचि येथें बोलिले । सर्वभूतें म्हणोनी. ॥ ७३६ ॥ कल्पक्षयीं प्रकृतीतें मिळती । त्यांस कल्पादिकाळीं म्हणे जगत्पती । मी निर्मितों कीं मातें पावती । निर्मित नसें तयां हा भाव. ॥ ७३७ ॥ म्हणतां कल्पक्षय१ सूचवी महाप्रलय । कल्पादि शब्दें मायेचा उदय । तो प्रथम सृष्टिकाळ. ॥ ७३८ ॥ कल्पशब्दें ब्रह्मयाचा दिवस । म्हणोनि दिनप्रलय दिनसृष्टि यास । म्हणों नये कीं सर्व शब्दार्थरस । वायां जातो या अर्थें. ॥ ७३९ ॥ होतां महाप्रलय । तोही ब्रह्मयाचा समाप्तिदिन होय । आणि मायेचा जो उदय । तो प्रथम दिवस

कल्पाचा. ॥ ७४० ॥ ऐसा करावा अर्थ । अन्यथा सर्वशब्द होती व्यर्थ । आणि अष्टमीं दिनकल्प लय उदय पार्थ । सांगतां समजला त्याचीही पुनरुक्ती. ॥ ७४१ ॥ आणि लोकत्रयाचाच क्षय । होय होतां दिनप्रलय । सर्वांही भूतांचा लय उदय । तो नव्हे हें सर्वशब्दें अतिस्पष्ट. ॥ ७४२ ॥ एवं प्रकृतीतें पावती । त्यांतें पुन्हा निर्मितों म्हणे श्रीपती । यावरून मातें पावतां न परतती । सूचवी हें समाधान. ॥ ७४३ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । परिसोत आदीं. ॥ ७४४ ॥ पूर्वश्लोकीं भगवंतें । ऐसें बोलिलें कीं सर्वभूतें । कल्पक्षयीं प्रकृतीतें पावती त्यांतें । मी कल्पादिकाळीं निर्मितों. ॥ ७४५ ॥ लय पावती प्रकृतींत । आणि मी निर्मितों म्हणतो भगवंत । कीं सत्ता तेथें निश्चित । ईश्वरत्व बोलावें. ॥ ७४६ ॥ कीं शूर भांडोनि गड घेती । रायें गड घेतला म्हणती । या भावें म्हणे जगत्पती । मी निर्मितों म्हणोनी. ॥ ७४७ ॥ तथापि अकर्ता आपण । सृष्टि स्थिति संहार हा प्रकृतिगुण । अधिष्ठान आपण निर्गुण । हे समस्त विवर्त मायाप्रकृति माझी तीचे. ॥ ७४८ ॥ तथापि ते सत्ताहीन । आपण तीचें अधिष्ठान । जेथें सत्ता तेथें ईश्वरत्व अर्जुन । समजे ऐसें बोलतो या श्लोकीं. ॥ ७४९ ॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

अगा! आपली प्रकृती । अधिष्ठूनि तीतें मी जगत्पती । पुनः पुनः हा भूताचा ग्राम ये रीती । मी निर्मितों. ॥ ७५० ॥ प्रकृति अधिष्ठूनि निर्मितों म्हणे । तों अर्जुनास खूण बाणे । विवर्तातें अधिष्ठी अधिष्ठान हें जाणे । पात्र भगवत्कृपेचें. ॥ ७५१ ॥ रज्जु अधिष्ठी सर्पातें । शुक्ति अधिष्ठिते रुप्यातें । तंतु अधिष्ठी पटातें । घटातें मृत्तिका. ॥ ७५२ ॥ हे कार्यरूपिणी प्रकृती । सूचवी मायाधिपती । प्रलयानंतर जगत्पती । योगनिद्रा करी तेव्हां हे नसे. ॥ ७५३ ॥ रज्जूवरी सर्प दिसे । तेव्हां कीं द्रष्टा असे । कर्तयाविण न भासे । पट तंतूंत घट मृत्तिकेंत. ॥ ७५४ ॥ जे प्रलयकाळीं नव्हती । ते सृष्टिकाळीं कोठोनि आली प्रकृती । या गोष्टीच्या समाधानार्थ मायापती । 'प्रकृतिं स्वां' म्हणतसे. ॥ ७५५ ॥ कीं ते कारणरूपिणी । अगम्यत्वें तेव्हां होती निर्गुणीं । मध्यान्ह टळतां किरणीं । जैसा असे जळभास. ॥ ७५६ ॥ वृक्षाचें पत्र पुष्प फळ पडे । तें अन्यत्र कोठें तरी सांपडे । मध्यान्ह टळतां कोणी-

कडे । जळाभास गेला म्हणावा ? ॥ ७९७ ॥ जरी म्हणावा की नाश जाला । तरी दुसरे दिनीं कैंचा आला ? । म्हणावा आणीक उपजला । तरी नाश पू-र्विल्याचा देखिला कोठें ? ॥ ७९८ ॥ एवं जळाभास काळचा । म्हणावा पक्ष हाचि साचा । परि प्रातःकाळीं भास त्याचा । लेशही मध्यान्हापूर्वी दिसेना. ॥ ७९९ ॥ तेव्हां किरणरूपें किरणीं । होतें म्हणावें तें मृषा पाणी । तैसी प्रकृति निर्गुणरूपें निर्गुणीं । सृष्टिकाळापूर्वी होती म्हणावी. ॥ ७६० ॥ तेव्हां ते म्हणों ये स्वप्रकृती । 'प्रकृतिं स्वामधिष्ठाय' म्हणोनि मायाधिपती । म्हणे आणि तीतें अधिष्ठानीं मागुती । सृष्टिकाळीं निर्मितों भूतांतें म्हणतसे. ॥ ७६१ ॥ एवं प्रकृतिपुरुष एक । हें सूचवी उत्तमश्लोक । प्रकृतिपुरुषव्य-तिरेकें । तो एकत्व कळाया अन्वयें गुरु बोले. ॥ ७६२ ॥ एवं वाईट ते अ-विद्या । बरी सर्वथा ते ब्रह्मात्मविद्या । ऐक्यही न सोसे गुरुवराद्या । प्रलया-दिकीं ज्या ऐक्यांत अविद्या वसतसे. ॥ ७६३ ॥ म्हणोनि मी देह । हा देहीं आत्मतेनें स्नेह । अविद्याजनित न तुटे संदेह । जडचैतन्यऐक्याचा. ॥ ७६४ ॥ ऐक्य जडचैतन्याचें । अन्वय ब्रह्मविद्येनें घडे तें साचें । अहंकारें देहा प्रति-बिंबाचें । ऐक्य तें ऐक्य म्हणों नये. ॥ ७६५ ॥ ते अहंकाररूपें ग्रंथी । जडचैतन्यास हें सर्वा ग्रंथीं । प्रसिद्ध असे मोक्षपंथीं । ते गांठी पहिली छेदावी. ॥ ७६६ ॥ तथापि प्रकृति त्रिगुण । तेही प्रळयीं निर्गुणीं निर्गुण । त्यांतही 'प्रकृतिं स्वामधिष्ठाय' म्हणतां खूण । कारण प्रकृतीची सूचवी. ॥ ७६७ ॥ ते अकस्मात् प्रगटे निर्गुणीं । जळभास जैसा किरणीं । हे अनादि स्वशक्ति ऐसें चक्रपाणी । पुनः पुनः निर्मितो म्हणतां सूचवी. ॥ ७६८ ॥ कीं प्रति-दिनीं जळाभास किरणीं । प्रतिसृष्टिकालीं माया निर्गुणीं । पुनः पुनः म्हणोनि चक्रपाणी । प्रतिदिन मृगजळदृष्टांतें सूचवी. ॥ ७६९ ॥ कीं सृष्टीहूनि पूर्वकाळीं श्रुती । कांहींच नव्हतें म्हणती । येथें भेदवादी बोलती । कीं ते काळीं कांहीं नव्हतें म्हणतां असे तो काळ. ॥ ७७० ॥ तरी तें प्रलयशेष ब्रह्मच काळे। तेथें मिथ्या द्वैतकाळाचाही नसे विटाळ । म्हणोनि पुनः पुनः निर्मितों म्हणे मेघनीळ । दृष्टांत दिनदिनीं मृगजळाचा सूचवी. ॥ ७७१ ॥ सृष्टीहून पूर्वी निर्गुण । तेंचि काळ ऐसी खूण । ऋग्वेदीं श्रुतिमुखें ब्रह्म सगुण । बोलतसे. ॥ ७७२ ॥ 'नासदासीन्नोसदासीत्तदानीं' म्हणोनी । हे श्रुति म्हणे त्या काळीं कांहीं नव्हतें यावरूनी । ब्रह्मचि तो काळ हें 'तदानीं'शब्देंकरूनी । श्रुति बोले. ॥ ७७३ ॥ जरी ब्रह्मीं ते काळीं कांहीं । श्रुति म्हणती नाहीं । तरी ब्रह्म एक आणि काळही । दुसरा एक सिद्ध होतो. ॥ ७७४ ॥ मागुती त्याहूनि अन्य

कांहीं। पुढें श्रुति म्हणे नाहीं। तों म्हणतां पूर्वोक्त मागुतीही। काळच हा अर्थ सिद्ध होतसे. ॥ ७७५ ॥ **'तस्माद्धान्यन्नरः किंचनास'**। हे श्रुति शेवटीं तच्छब्दें त्यास। जो **'तदानीं'** म्हणोनि बोलिला त्याच काळास। सूचवोनि म्हणे त्यावेगळें अन्य नसे. ॥ ७७६ ॥ एवं अखंड काळ ब्रह्म निर्गुण। तेथें काळ-शक्ति माया त्रिगुण। प्रगटे सृष्टिस्थितिसंहारखूण। कालत्रयाची तीकरितां. ॥ ७७७ ॥ ऐसे द्विविध काळ असती। पुढिलिया अध्यायांतही जगत्पती। सांगेल सांगतां विभूती। द्विविधकाळ तेथें. ॥ ७७८ ॥ **'कालः कलयतामहं'** म्हणोनी। **'अहमेवाक्षयः कालः'** म्हणेल मागुती यावरोनी। क्षयरूप अक्ष-यरूप काळ दोनी। सूचवील पुढें स्पष्टार्थही होणार. ॥ ७७९ ॥ एवं काळही नव्हे कारण। ब्रह्मीं प्रकृतीनें होतां चलन। ती करूनि द्रष्टा सगुण। सृष्टि निर्माण करितसे तो सृष्टिकाळ. ॥ ७८० ॥ मिथ्या होऊनि मृगजळ। नव्हे जैसा रज्जूवरील व्याळ। कीं टळतां मध्यान्हकाळ। द्रष्टा असे मृगजळ दिसेना. ॥ ७८१ ॥ जेव्हां द्रष्टा पाहे। तेव्हां रज्जूवरी सर्प आहे। द्रष्टा पाहे तरी न राहे। मृगजळ टळतां मध्यान्ह. ॥ ७८२ ॥ द्रष्टा पाहे तरी जेव्हां न दिसे। तेव्हां द्रष्टा न पाहे तरी असे। प्रतिसृष्टिकाळीं ऐसे। ब्रह्मीं लय उदय मायेचे. ॥ ७८३ ॥ माया प्रगटे प्रथम। तिच्या योगें सगुण होय ब्रह्म। तेधवां द्रष्टत्व-धर्म। आणि इच्छा सृष्टीची तेधवां. ॥ ७८४ ॥ तेव्हां अधिष्ठूनि ते प्रकृती। स्वयें अधिष्ठान तिचें जगत्पती। सृष्टीकरितां उत्पन्न होती। भूतें स्थावरें जंगमें. ॥ ७८५ ॥ जिव्हेनेंच जिव्हा म्हणे। तो जिव्हेस आपणासही द्रष्टा जाणे। जिव्हा आपणास त्यास दोहींसही नेणे। मायेनें ईश्वर द्रष्टा मायेचा ये रीती. ॥ ७८६ ॥ मायेनेंच मायेस आपणास पाहे। तीवांचूनि निर्धर्म जो आहे। तो निर्गुणीं निर्गुणच होऊनि राहे। सृष्टिकाळापूर्वी कारणीं आपल्या. ॥७८७॥ एवं बीजांत वृक्ष वसे। ऐसी सृष्टीहूनि पूर्वीं प्रकृती असे। तें जडकारण तिचेंहि कार्य दिसे। वृक्षबीजांतूनि उपजे जे रीती. ॥ ७८८ ॥ ते ब्रह्मीं ऐसी कीं किरणीं जैसें जळ। कीं ब्रह्मरज्जूंत ते जैसा व्याळ। कीं सागरीं जैसे कल्लोळ। तैसें कार्य हें विश्व ब्रह्मीं त्या कारण प्रकृतीचें. ॥ ७८९ ॥ **'प्रकृतिं स्वाम-धिष्ठाय'** म्हणोनी। प्रकृति भिन्न नसे ऐसें 'स्व'शब्देंकरोनी। सूचवी कीं कार्य कारणावस्था दोनी। प्रकृतीच्या मजवेगळ्या नसती हा भाव. ॥ ७९० ॥ ये रीती हा भूतग्राम। पुनः पुनः निर्मितों म्हणे घनश्याम। नांना रूप नांना नाम। सकळ भूतग्राम मी निर्मितों. ॥ ७९१ ॥ प्रतिबिंब जीवांश त्यासहित। स्थावर अथवा जंगम शरीर तें भूत। त्यांचा ग्राम समुदाय म्हणे भगवंत।

पुनः पुनः ये रीती निर्मितों. ॥ ७९२ ॥ निर्मितों प्रकृतीतें अधिष्ठूनी । आणि पुनः पुनः म्हणोनी । सूचवी या दों गोष्टींकरोनी । अनादित्व प्रकृतीचें. ॥ ७९३ ॥ आतां प्रकृति पुनः पुनः प्रगटते । तरी तेच प्रगटो भूतसृष्टि कां होते । शंका ऐसी ये स्थळीं येते । ते चतुर्थचरणीं परिहरतो. ॥ ७९४ ॥

चतुर्थचरण—**अवशं प्रकृतेर्वशात्** ॥

अगा! जो दुसरिया एकास वश । स्वतंत्रपण नसे लेश । तयास म्हणावें अवश । तरी अवश भूतग्राम हा. ॥ ७९५ ॥ कीं स्ववश असता स्वतंत्र । तरी न उपजता भूतग्राम हा विचित्र । तरी कोणास वश ज्यास्तव परतंत्र। भूतग्राम हा जरी म्हणसी. ॥ ७९६ ॥ तरी अर्जुना! हे अनादि प्रकृती। जे तुज सांगतों प्रस्तुतीं । वश भूतें तीतें असती । अवश भूतग्राम यास्तव. ॥ ७९७ ॥ वश भूतें प्रकृतीतें । म्हणोनि पुनः पुनः होती भूतें । मी अधिष्ठूनि तीतें । निर्मित असें. ॥ ७९८ ॥ अधिष्ठूनि निर्मितों म्हणे । यांत आपलें अकर्तृत्व बाणे ।पुनः सत्ता तेथें कर्तृत्व हेंही जाणे । स्वभक्त ऐसें बोलिला या श्लोकीं. ॥ ७९९ ॥ हें आयके धनंजय । तो मागुना सशंक होय । कीं जीवाचिया कर्मींही हाचि निश्चय । कीं प्रकृति अधिष्ठूनीच करिती जीवही. ॥ ८०० ॥ जीवत्वींही चिदंशातें । अकर्तृत्व ऐसेंच येतें । तथापि बंधक होतें । कर्म तें. ॥ ८०१ ॥ जरी न कळे तरी चिदात्मा अकर्ता । प्रकृति करी स्वयें तो नव्हे कर्ता । तथापि जीवांस बंध ऐसी वार्ता । आयकावी याचियाही अकर्तेपणाची. ॥ ८०२ ॥ या शंकेचा परिहार । करावया सर्वेश्वर । बोलतसे यानंतर । स्ववैराग्यसूचक श्लोक हा. ॥ ८०३ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय ।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥

अगा धनंजया! तींही । कर्में न बाधती मातें कांहीं । कीं मी आसक्त होत नाहीं । त्या कर्माच्या ठायीं कदापि. ॥ ८०४ ॥ एक कर्ता एक पारखा । उगा उदासीन असे त्यासारिखा । मी उदासीन असतों सखा । तुजसारखिया भक्ताचा. ॥ ८०५ ॥ धनंजया! म्हणोनी । ये स्थळीं या नांवें करूनी । आळवी सूचवोनी । अर्थ ऐसा. ॥ ८०६ ॥ कीं म्हणतां उदासीन । झणी घाबिरा होय अर्जुन । म्हणोनि सूचवी भाव गहन । कीं तूं तरी अगा! धनंजय. ॥ ८०७ ॥ मी सर्वत्र उदासीन । परि अकिंचनाच्या[1] ग्रंथीचें धन । धनलोभी धन करी जतन । प्रेमपाशें ऐसें मज ते बांधती. ॥ ८०८ ॥ प्रेम

१. कंगालाच्या, द्रव्यहीनाच्या.

ऐसें मी असें । धन अकिंचनाचें मी असें । तो रथीं सारथी होऊनि बैसे । घोडे तुझे हांकित. ॥ ८०९ ॥ मज ऐशा अकिंचनाच्या धना । तुवां जिंकिलें अर्जुना ! । कीं तुजसारखिया आणिका सधना । लभ्य सर्वथा मी नव्हें. ॥ ८१० ॥ जें अलभ्य लभ्य जालें । तें त्याणें म्हणावें जिंकिलें । एवं धनंजय म्हणतां या बोलें । मजचि जिंकिलें तुवां हें सूचवी. ॥ ८११ ॥ भाव हा कीं उदासीन । मी होय परि जे भक्तजन । त्यांच्या ठायीं मी जगज्जीवन । उदासीन नव्हे सर्वथा. ॥ ८१२ ॥ **'ये यथा मां प्रपद्यंते'**। या श्लोकीं हे गोष्टी साधते । उदासीनताही जतन होते । भजती तैसा भजतों या स्वभावें. ॥ ८१३ ॥ **'ये यथा मां प्रपद्यंते'** या श्लोकेंकरोनी । **'तां तथैव भजाम्यहं'** म्हणोनी । चतुर्थाध्यायांत सिद्धांत जाला यावरोनी । उदासीन परि भजनानुरूप फळ देतों. ॥ ८१४ ॥ प्रस्तुतीं माझ्या पायीं आसक्त मन । त्यावरी मी नव्हें उदासीन । म्हणोनि तुवां जिंकिलें धन । अकिंचनाचें धनंजया ! ॥ ८१५ ॥ भक्तावेगळा अन्यत्र । आपण उदासीन सर्वत्र । म्हणोनि हें सूचवूनि म्हणे कमलनेत्र । धनंजया ! मी उदासीन म्हणोनी. ॥ ८१६ ॥ एवं जीवत्वींही चित्स्वरूपीं । कर्तृत्व न लागे तथापी । वासना त्याची पापी । असे त्यांच्या बुद्धींत. ॥ ८१७ ॥ बंध मोक्ष दोनी । उपाधीच्या शिरीं म्हणोनी । अहंकर्तृत्वाभिमानी । बुद्धि जीवांची करी जीवांस कर्मबद्ध. ॥ ८१८ ॥ जीवोपाधीस अज्ञान । म्हणोनी वासनायुक्त त्याचें मन । जीवा तया विना विषयचिंतन । प्रवृत्ति कर्मी घडेना. ॥ ८१९ ॥ करिती वासनेनें ऐसें । उदासीन ते म्हणावे कैसे ? । रजतरूपें शुक्ति दिसे । ते रजतार्थी रजतीं उदासीन कां होती ? ॥ ८२० ॥ विश्व विषयाकारें भासे । ते वासनाबद्ध नव्हती कैसे ! । अज्ञानें विषयासक्त ऐसे । वैराग्य कैचें तयांतें ? ॥ ८२१ ॥ जे वैराग्यहीन । ते कर्मी नव्हती उदासीन । यालागीं कर्में करिती बंधन । जीवांसी. ॥ ८२२ ॥ आपण नित्य विरक्त । म्हणोनी सृष्टयादि कर्मी नसे आसक्त । नित्य ज्ञानी नित्य मुक्त । उदासीना सारिखा यालागीं. ॥ ८२३ ॥ भगवच्छब्दीं वैराग्यगुण । तो भगवान् षड्गुण । हे गोष्टी बोलतो आपण । भगवद्गीतेंत. ॥ ८२४ ॥ एवं कृपाळू स्ववैराग्यगुण । समजोन भजोत भक्त निपुण । म्हणोनि या प्रसंगसंगतीनें आपण वैराग्यगुण । आपला येथें बोलतो. ॥ ८२५ ॥ कीं वैराग्यगुणयुक्त । समजोनि भजती भक्त । तेही होती विरक्त । हें चतुर्थाध्यायांत बोलिला. ॥ ८२६ ॥

चतुर्थाध्यायश्लोक—न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥

हे मागेंचि पूर्ण जाली । प्रतुस्त गोष्टी ऐसी आली । कीं वैराग्यगुणपूर्वक उपासना केली । तरी वैराग्यलभ्य होय त्यातें. ॥ ८२७ ॥ यास प्रमाण हा चतुर्थाध्यायश्लोक । येथें म्हणे उत्तमश्लोक । कीं मज नव्हे कर्म बंधक । कर्मी स्पृहा नसे म्हणोनी. ॥ ८२८ ॥ स्पृहा कर्मीं नसे यास्तव । मातें कर्मे न लिंपती म्हणे देवाधिदेव । ऐसा आपला गुण जाणे मानव । तोही कर्मीं नव्हे बद्ध म्हणतसे. ॥ ८२९ ॥ एवं वैराग्यगुण जाणे । त्या भगवदुपासकासही वैराग्य बाणे । या चतुर्थाध्यायश्लोकांत म्हणे । उत्तरार्धीं ऐसें भगवंत. ॥ ८३० ॥ मज कर्मीं नसे स्पृहा । जो जाणतो माझा वैराग्यगुण हा । तोही निस्पृह होतां त्या फलनिस्पृहा । कर्मबंध नव्हे हा अर्थ. ॥ ८३१ ॥ तोचि वैराग्यगुण । या नवमाध्यायांत नवमश्लोकीं सगुण । श्रीकृष्ण बोलतो येथें खूण । पहावी जे या चतुर्थाध्यायश्लोकीं उत्तरार्धीं. ॥ ८३२ ॥ ऐसेच षड्गुण । समजोनि भजे ब्रह्म सगुण । षड्गुणांश लाभे तोचि निपुण । भगवत्पदातें पावतो. ॥ ८३३ ॥ प्रसंग बोलिला गुण । त्या प्रसंगाची हे खूण । कीं जीवत्वींही आत्मा निर्गुण । परि कर्मबंध त्यातें कर्में होतसे. ॥ ८३४ ॥ तरी ईश्वरासही असेल बंध । त्याच्या परिहारार्थ हा नवम पद्यप्रबंध । कीं मी उदासीन म्हणोनी गंध । न लागे मातें कर्मबंधाचा. ॥ ८३५ ॥ त्या कर्माचीं फळें जरी । मी इच्छितों आसक्त होतों तरी । मजही बंध होता परी । अनादिवैराग्यगुणें नसे मज बंध. ॥ ८३६ ॥ मी अनादि विरक्त । म्हणोनि त्या कर्मीं नसें आसक्त । जीवही कर्मबंधापासूनि मुक्त । होती फलासक्ति टाकितां हा भाव. ॥ ८३७ ॥ आतां यानंतर श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञलोक । परिसोत आदीं. ॥ ८३८ ॥ चित्स्वरूपीं कर्तृता । जीवासही नसे तरी बंधवार्ता । असेचि तैसी अकर्तृता । असेल ईश्वराची ही. ॥ ८३९ ॥ ऐशिये शंकेचें स्थळ । देखोनि परिहरिता जाला मेघनीळ । कीं मी विरक्त उदासीनासारिखा केवळ । म्हणोनि मातें न बाधती कर्में. ॥ ८४० ॥ कर्मीं आसक्त न होणें । आणि उदासीनासारिखें असणें । हाही गुणधर्म कीं निर्गुणपणें । ऐसा आपण ऐसें न म्हणावें. ॥ ८४१ ॥ ज्यास हा वैराग्यगुण । त्यास म्हणवेना निर्गुण । आणि प्रकृतीचें तो अधिष्ठान-

पण । निर्गुणातें. ॥ ८४२ ॥ तेव्हां जगाचें उपादानकारण । ब्रह्म तें म्हणावें निर्गुण । जयासि हे वैराग्यादि गुण । जगत्कारण न म्हणवे तयातें. ॥ ८४३ ॥ येथें संशय ये रीती । उपजेल हें जाणे जगत्पती । म्हणोनि मी सगुण जो मायाधिपती । तोचि जगत्कारण म्हणतसे या श्लोकीं. ॥ ८४४ ॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुनानेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥

अगा ! मी अध्यक्ष मायेचा धनी । अध्यक्षता न घडे निर्गुणीं । युक्त होऊनि तिच्या सत्त्वगुणीं । धनी तिचा मी होतसें. ॥ ८४५ ॥ आणि मज अध्यक्षाच्याच योगेंकरोनी । प्रकृति चराचरसहित लोक तीनी । प्रसवे ते स्वयें प्रसवों न शके म्हणोनी । मी सगुणत्वींही कुंतीसुता ! जगत्कारण. ॥ ८४६ ॥ या हेतूकरोनी । जग विविध होऊनी । वर्ततसे म्हणोनी । कुंतीसुता ! मी सगुणत्वींही जगत्कारण. ॥ ८४७ ॥ कौंतेय म्हणजे कुंतीसुत । या नांवें गहनभावें आळवी भगवंत । कीं जननीपासूनि पुत्र उपजतो निश्चित । परि ते प्रसवते स्वपतीच्या हेतूकरोनी. ॥ ८४८ ॥ पति म्हणावा केव्हां । कीं बाईल करील जेव्हां । तिच्याच योगें तेव्हां । पति तिचा. ॥ ८४९ ॥ ते जेव्हां बाईल जाली । त्यास पति म्हणों लागली । आणि त्याच करितां व्याली । विविध-संतान. ॥ ८५० ॥ येथें कुंतीसुता ! कौंतेया ! । म्हणे हा अर्थ सुचवावया । कीं प्रकृतियोगेंच धनंजया ! । अध्यक्ष मी प्रकृतीचा. ॥ ८५१ ॥ आणि माझ्याच सत्तेंकरूनी । प्रसवते चराचर म्हणोनीं । कौंतेया ! म्हणतां यावरूनी । सूचवी हा अर्थ. ॥ ८५२ ॥ याचा ऐसा विचार । कीं ब्रह्ममायायोगेंच ईश्वर । तीपासूनि होतें चराचर । परि संकल्पें त्याचि सर्वज्ञाचिया. ॥ ८५३ ॥ तिच्या योगेंचि तीतें । ईश्वर प्रवर्तवी प्रकृतीतें । प्रजांचे धनें प्रजांतें । वर्तवी जैसा भूपती. ॥ ८५४ ॥ प्रजांपासोनि घेऊनि धन । त्या धनें ठेवोनि सेवक जन । प्रजा वर्तवी करी शासन । ऐसा प्रकृतिगुणें प्रकृति गुणातें वर्तवी. ॥ ८५५ ॥ लोखंड पिटायाचें साधन । लोखंडाचाच चिमटा ऐरणी घन । तैसा प्रकृतीतें वर्तवी जगजीवन । त्याच प्रकृतीकरूनी. ॥ ८५६ ॥ एवं प्रकृतीचे भाग दोनी । एक ब्रह्म आपण म्हणोनी । या अखंड प्रत्ययेंकरूनी । निर्गुणीं सगुणत्व. ॥ ८५७ ॥ हा ईश्वर प्रत्यय । जो अविच्छिन्न अखंडानंदमय । सृष्टयादि शक्तीचा उदय । त्यापासूनि आणि लयही तयाच सगुणांत. ॥ ८५८ ॥ कीं

१ मुख्यकारण (घटाच्या मातीप्रमाणें.) २. ऐरण.

तो लयकाळही सरे । तेव्हां अभाव साक्षित्व स्फुरे । कांहीं उरलें नाहीं ऐसें स्मरे । उपाधि ब्रह्मात्मप्रत्यय ईश्वराचा ॥ ८५९ ॥ तेही माया पावे लय । तो योगनिद्रासमय । पुन्हा ब्रह्म आपण म्हणोनि उदय । प्रथम त्याच मायांशाचा. ॥ ८६० ॥ तेथें ब्रह्म निर्गुण आपण । इतकेंचि मात्र स्फुरण । त्या स्फुरणीं सर्वज्ञपण । भूतभविष्यस्मरणरूप प्रगटतें. ॥ ८६१ ॥ ब्रह्म आपण ऐसें अखंड जाणे । तेंचि मायायोगें ब्रह्मीं ईश्वरत्व बाणे । तेचि. माया मी माया म्हणे । ब्रह्मयोगें ते शक्ति परदेवता शाक्तांची. ॥ ८६२ ॥ ब्रह्मात्मत्वाचें स्फुरण । तेथेंही वृत्ति माया आणि चैतन्य निर्गुण । मी माया येथेंही वृत्ति मायागुण । प्रकाशक तेंचि चैतन्य निर्गुण. ॥ ८६३ ॥ प्रथम स्फुरे ब्रह्म आपण । तो ईश्वर तें ब्रह्म सगुण । माया मी म्हणवोनि दुसरें स्फुरण । ते प्रकृति तो ईश्वर तिचा अध्यक्ष. ॥ ८६४ ॥ ईश्वरांशीं सर्वज्ञपण । मायांशा जड सृष्टयादिकाचें स्फुरण । ते त्या अधीन ब्रह्म जो सगुण । आपण ब्रह्म म्हणे मायांशेंकरोनी. ॥ ८६५ ॥ तो ती करोनी जे सृष्टी करी । ते होणारच तीपासूनि परी । त्यावांचोनि तिच्या कूसरी । न प्रगटती तिच्या स्वसामर्थ्यें. ॥ ८६६ ॥ दुग्धांत असे घृत । त्याच पासोनि उपजे तें निश्चित । परि तावी विरजी मथी तदुचित । क्रिया जाणणार कारण त्या घृताचें. ॥ ८६७ ॥ अथवा जैसा लोहार । लोहाचेच करितो नानाकार । परि घडमोडीसाधनप्रकार । या लोहाचेचि सर्व. ॥ ८६८ ॥ लोहाचे सर्व आकार । लोहाचपासूनि उपजती ते प्रकार । तथापि लोहसाधनेंयुक्तचि लोहार । कारण म्हणावा. ॥ ८६९ ॥ लोहाचपासोनि होती नग । मायेचपासोनि होतें जग । ते लोहाराकारणाकरितांच परि योग । लोहसाधनाचा त्यापाशीं. ॥ ८७० ॥ या लागीं म्हणे श्रीपती । कीं चराचर प्रसवे तेच प्रकृती । परि मायायोगेंचि अध्यक्ष मी मायाधिपती । त्या मजकरितां म्हणे कीं ते प्रसवते. ॥ ८७१ ॥ एवं जगत्कारण निर्गुण । तेंचि आपण म्हणोनि ज्यास वाटे तो सगुण । तो सर्व जाणे म्हणोनि जगाचें द्विविधही कारण । ईश्वर म्हणावा. ॥ ८७२ ॥ घटास कारण माती । घटास सोडीना ये रीती । ब्रह्म सर्वत्र सर्वभूतीं । उपादानकारण तें म्हणावें. ॥ ८७३ ॥ तें निखळ निर्गुण । परि तेंचि मायांशें जाणे कीं ब्रह्म आपण । हा अखंडानुभव तें सगुण । सगुणचि उपादानकारण ये रीती. ॥ ८७४ ॥ घटीं सबाह्य माती । तैसें जगीं ब्रह्म तें आपण ये रीती. । अनुभव ज्याचा तो मायाधिपती । उपादानकारण जगाचें कां तो नव्हे? ॥ ८७५ ॥ आणि घटास कारण कुंभार । जो घडी घटाचा आकार । तो निमित्तकारण तैसा सर्वेश्वर ।

मानिती हा अर्थ. ॥ ९०८ ॥ येथें शंकला अर्जुन । कीं दुर्योधनादिक दुर्जन । यांचिया विवेकाचे नयन । कां झांकिले ? ॥ ९०९ ॥ आतां ते म्हणावे मूढ । तरी आम्हीही नेणों याचें ऐश्वर्य गूढ । परि नारदव्यासादि सर्वज्ञ प्रौढ । जाणों त्यांच्या मुखें ऐकोनी? ॥ ९१० ॥ ऐसें हेही जाणती । मागुती मनुष्यच यास म्हणती । कां जाली ऐसी नेणती । बुद्धि यांची. ॥ ९११ ॥ उद्योगपर्वीं थोर थोर मुनी । दुर्योधनातें हा सर्वेश्वर म्हणोनी । नाना आख्यानें करोनी । विशद अत्यंत बोलिले. ॥ ९१२ ॥ धृतराष्ट्र साक्षात्कारें बाप । तो दुर्योधनातें याचा महेश्वरत्वप्रताप । सांगे म्हणे अपजय आणि महत्पाप । आज्ञा या सर्वेश्वराची मोडितां. ॥ ९१३ ॥ आइके इत्यादि गोष्टी । विश्वरूप सभेस देखे दृष्टी । जेव्हां धरावा कृष्ण म्हणोनि दुष्टीं । विचार केला. ॥ ९१४ ॥ कर्ण दुःशासन दुर्योधन शकुनी । हें दुष्ट चतुष्टय मिळोनी । कृष्णास बांधितां पांडव जिंकिले म्हणोनी । विचार करूनि चार मांडिले. ॥ ९१५ ॥ तेव्हां सभेंत सर्वत्र । मागें पुढें कृष्ण कमलनेत्र । धृतराष्ट्रास देऊनि दिव्य नेत्र । दाखवी आणि दुर्योधनादिकांहीं. ॥ ९१६ ॥ ऐसें जयांस कळे । कां त्यांची बुद्धि न वळे । मनुष्यरूप देखोनि खवळे । मनुष्य हाही म्हणोनी. ॥ ९१७ ॥ ऐसी अर्जुनाची शंका । तत्काळ कळली शेषपर्यंका । याचें निमित्तही श्रीवत्सांका । बोलणें लागलें. ॥ ९१८ ॥ यावरोनि या वेगळेही नर । वेद शास्त्र पुराणें वाचूनिहि पामर । अवतारमहिमा समजोनिही आदर । न धरिती अवताररूपीं ईश्वराच्या. ॥ ९१९ ॥ तेही ऐसेच रीती । श्रद्धा कळत कळत न धरिती । हें किमर्थ तरी यांचें त्याचें जगत्पती । वृत्त मिसळोन सांगतो या श्लोकीं. ॥ ९२० ॥

> **मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।**
> **राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥**

अगा! बरें वाईट दोहींचें निमित्त । केवळ हें आपुलें चित्त । त्याचें विपरीत होतां वृत्त । व्यर्थ होतें सर्वही. ॥ ९२१ ॥ आशा जयाची व्यर्थ । कीं प्रारब्धीं नाहीं तो पुरुषार्थ । आपणास होऊ म्हणोनि तदर्थ । मज टाकोनि भजती क्षुद्रदेवतातें. ॥ ९२२ ॥ आणि जें प्रारब्धीं असे । तें यथाकाळें फळ दिसे । तदर्थ काम्यकर्म केलें तें बैसे । पुढें वज्रलेप बंधन करोनी. ॥ ९२३ ॥ धनमानसंतानाकारणें सेवा । करोनी भजतो क्षुद्रदेवा । नसे प्रारब्धीं तेधवां । आशा

---

१. पोरखेळ. २. लहान.

होते ते व्यर्थ. ॥ ९२४ ॥ प्रारब्धानुरूप कपाळीं । होणार होतें त्याकाळीं । जालें आणि या काम्यें पाडिला जाळीं । बंधाचिया. ॥९२५॥ येच जन्मीं मज संतान । हो म्हणोनि करी भजन । तें पुढें जालें बंधन । दोहीं परी. ॥९२६॥ ये जन्मीं नव्हे परी । फळ होईल जन्मांतरीं । आशा व्यर्थ नव्हे म्हणावी यापरी । तरी खरीच गोष्टी हेही. ॥ ९२७ ॥ परंतु सूकरादियोनी । जन्मांतरीं मज हो म्हणोनी । ये रीती तों त्याच्या मनीं । नव्हती आशा सर्वथा. ॥९२८॥ बहु काळ नांदो म्हणोनी । प्रवेशला स्थिर मुहूर्ते करोनी । तों शृंखळा पायीं त्या सदनीं । पडली शाश्वत बहु काळ. ॥ ९२९ ॥ त्या स्थिरा मुहूर्ताची । फळसिद्धि तों जालीच साची । परि आशा नव्हती याची । ऐसें व्हावें म्हणोनी. ॥ ९३० ॥ प्रयत्नें देवता भजोनी । न मागे सूकरादि योनी । अथवा जन्मांतरीं फळ हो म्हणोनी । हेंही न मागे. ॥ ९३१ ॥ एवं,च देवताभजन । करी इच्छी धन मान संतान । तें प्रारब्धानुरूप होतां सेवन । म्हणावें काय त्या देवांचें? ॥ ९३२ ॥ त्या देवें हें दीधलें । म्हणोनी याला जरी वाटलें । तें याचें यास लभ्य होतां जालें । व्यर्थ भजन त्या देवाचें. ॥ ९३३ ॥ यास न कळे हा अर्थ । तथापि आशेतें तो गोंवे व्यर्थ । याचा यास सांपडला पदार्थ । त्याची आशा वृथाचि ते जाली. ॥ ९३४ ॥ हें रहस्य[1] जन नेणे । त्यापासोनि आशा फळली म्हणे । परंतु साक्षी सर्वज्ञ जाणे । तो म्हणे मोघाशा[2] म्हणोनी. ॥९३५॥ प्रारब्धीं फळ नसे । ते मोघाशा तों त्यासही दिसे । जन्मांतरीं फळाचे फांसे । गळां पडती आशा वृथा करूनियां. ॥ ९३६ ॥ आतां पुढिले जन्मींच होयाचें फळ । म्हणोनि आशा धरिली केवळ । तों पूर्वसंचित त्याहूनिही प्रबळ । जन्म शतही फळ तें न पावे. ॥ ९३७ ॥ तेही मोघाशाच तेव्हां मागुतीं । कीं देव न दे जें जे काळीं मागती । अथवा सूकरादि अधमा गती । पावोनि तें फळ जन्मांतरींच पावेल. ॥ ९३८ ॥ पुढिले जन्मीं क्षत्रिय । होईन म्हणोनि धरिला आशय । देवताभजनीं दृढनिश्चय । तपस्वी मोठा. ॥ ९३९ ॥ आणि कृत्तिकानक्षत्रीं कार्तिकमासीं । स्वामि[3]दर्शनही घडलें होतें तयासी । सप्तजन्म विप्रजन्मासी । जाणें तया. ॥ ९४० ॥ क्षत्रियत्व देतें देवताभजन । व्यर्थ तेव्हां स्वामिदर्शन । विप्र वेदपारग सधन । होतां देवताभजन तें व्यर्थ. ॥ ९४१ ॥ तो मातापितृश्राद्धें चुकला । तेव्हां कोटि जन्म चांडाळ जाला । दोहीं गतींतें विलंब लागला । व्यर्थ आशा दोहींची. ॥ ९४२ ॥ याचे पूर्वपक्ष

---

१. गौप्य. २. व्यर्थ आशा. ३. कार्तिकस्वामी.

सिद्धांत । विशद बोलतां ग्रंथ वाढेल अत्यंत । एवं टाकोनि भगवंत । ऐसे जे क्षुद्रदेवता भजती. ॥ ९४३ ॥ युगांतरीं यागादि कर्मे केलीं । पुत्रादि फळें तत्काळ जालीं । तीं पूर्वपुण्येंच फळा आलीं । हें पुढें फळ होणार. ॥ ९४४ ॥ कांहीं न करी याहूनी । काम्यकर्ता बरा म्हणोनी । जैसें तैसें काम्यकर्मी जनी । प्रवर्तावें तात्पर्य शास्त्रकाराचें. ॥ ९४५ ॥ ते तत्काळ फळ बोलती । तत्काळ फळें जालीं ऐसेंही म्हणती । जन्मांतरावांचूनि फळ नाहीं जाणती । तरी रुचि दाविती जनप्रवृत्तिनिमित्त. ॥९४६॥ बीजाचा होय तरुवर । फळ तेव्हां हें प्रत्यक्ष गोचर । कर्माचें फळ विना जन्मांतर । नव्हे सर्वथा. ॥ ९४७ ॥ हे मूढाकारणें प्रवृत्ती । शास्त्र बोले कीं जे मोक्षमार्ग न जाणती । ते मुक्तिप्रदा मुकुंदा कां भजती । प्रस्तुतीं कळत इतर देवता भजती प्रसंग त्यांचा. ॥ ९४८ ॥ कीं ते मोघाश म्हणावे. । सकामदेवतांतर उपासक गणावे । मोघकर्म म्हणतां आणीकही जाणावें । निष्काम या वेगळे दोंपरी. ॥ ९४९ ॥ एक टाकोनि कामना । निष्काम देवतांतरोपासना । कर्म करिती मोक्षार्थ तों होईना । एका मुकुंदावांचूनी. ॥९५०॥ एक उगीच निष्कामकर्मे । करिती वर्णाश्रमोक्त धर्मे । तृतीयाध्यायांत बोलिलें त्या नेमें । विष्णुचरणीं न अर्पिती. ॥ ९५१ ॥ 'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र' । या श्लोकीं बोलिला कमलनेत्र । कीं विष्णूस न अर्पितां कर्ममात्र । बंध करी म्हणोनी. ॥ ९५२ ॥ नव्हे मोक्ष न चुके बंध । निष्काम कर्मेही होय फळसंबंध । न लागे बंधाचा गंध । कर्म अर्पितां भगवंतीं. ॥ ९५३ ॥ चुकोनि तें वर्म । निष्काम अनुष्ठिती स्वधर्म । त्याणें बंधचि होतां कर्म । व्यर्थ जालें. ॥ ९५४ ॥ कीं ज्याकारणें केलें । तें जेव्हां नाहीं होऊनि आलें । तें व्यर्थ म्हणावें जालें । मोघकर्मे इत्यादि. ॥ ९५५ ॥ आतां मोघज्ञान । त्यांत दों प्रकारींचे जन । एक वेदश्रद्धाहीन । एक वेदाश्रित. ॥ ९५६ ॥ चार्वाक बौद्ध इत्यादि । यांस श्रद्धा नसे वेदीं । जे वेदप्रमाण आणि भेदवादी । भेद त्यांचे त्यांत कितीएक. ॥ ९५७ ॥ कोणी इतर देवताभजन । करिती आणि अद्वैतही बोलती जन । मोघ त्यांचेंही ज्ञान । कीं अपरोक्ष न फळे तयांतें. ॥९५८॥ शब्दज्ञानीच ते होती । कळली जरी आत्मानात्मविवेकरीती । न बाणे स्वरूपसाक्षात्कारस्थिती । भगवत्प्रसादावांचुनी. ॥ ९५९ ॥ श्रीमद्भागवतीं वारंवार । बोलिला असे हा प्रकार । न बाणे अपरोक्षसाक्षात्कार । साकार भगवद्भजनावांचुनी. ॥ ९६० ॥ श्रीकृष्ण देवकीच्या उदरीं । ब्र-

ह्मादि देवीं स्तविला नानापरी । तेथें ब्रह्मा आणि शंकरवैखरी । बोले ऐसें या श्लोकीं. ॥ ९६१ ॥

भागवतश्लोक—सत्त्वं न चेद्धातरिदं निजं भवे-
द्विज्ञानमज्ञानभिदापमार्जनम् ।
गुणप्रकाशैरनुमीयते भवा-
न्प्रकाशते यस्य च येन वा गुणः ॥

शुद्धसत्त्वें अवतार । देवा! तूं करितोसि हा विचार । बोलतां ब्रह्मा आणि शंकर । अग्रगण्य देवांत हे वदती. ॥ ९६२ ॥ कीं हें निजसत्त्व तुझें हरी । प्रगट न होय रामकृष्णादि रूपें जरी । अज्ञाननाशक विज्ञान तरी । नव्हे जनांतें जी देवा! ॥ ९६३ ॥ कीं श्रवण कीर्तन । तुझ्या गुणांचें चिंतन । आणि सत्त्वमूर्तींचें भजन । न करितां मन निर्मळ न होय. ॥ ९६४ ॥ निर्मळ न होतां मन । नव्हे साक्षात्कार अनुभवज्ञान । तेव्हां न नासे अज्ञान । हा विचार मागें पुढें तेचि वदले. ॥ ९६५ ॥ या भावें म्हणती या श्लोकीं हरी । सत्त्व तुझें न अवतरे जरी । अज्ञाननाशक विज्ञान तरी । नव्हे कधीं.॥ ९६६॥ आतां आपणास आपण । न जाणणें हें अज्ञानाचें लक्षण । आणि जड प्रकाशक आत्मपण । कळणें ज्ञान हें. ॥ ९६७ ॥ यास सत्त्वमूर्ती अवतार । कां लागले म्हणावे तेव्हां हा विचार । व्यर्थ होतो म्हणोन हा पूर्वपक्षप्रकार । परिहरिती ब्रह्मा आणि सदाशिव. ॥ ९६८ ॥ कीं जडतत्त्वें भेद तिहीं गुणांचें । स्वयें यातें प्रकाश कैंचे । ऐसें असोनि प्रकाश यांचे । दिसती ज्या करितां तो आत्मा स्वप्रकाश. ॥ ९६९ ॥ ऐसें जड आणि जडप्रकाशक ज्ञान । हें नव्हे अपरोक्ष हा अनुमान । साक्षात्कार तेव्हां कीं मन । तन्मय होऊनि पाहे तयातें. ॥ ९७० ॥ ज्याचा जो गुण । तो त्या वेगळा म्हणती निपुण । माझें त्याचें म्हणावें तें तों आपण । नव्हे सर्वथा. ॥ ९७१ ॥ प्रस्तुतीं अनुमानरीती । आत्मा जडावेगळा दाविती । ज्याचा गुण ज्याकरितां म्हणती । प्रकाशक तो म्हणोनी. ॥ ९७२ ॥ जो आत्मयातें विचारितो। त्याचा देहादि गुण ज्याणें प्रकाशतो । तो त्यास आपला आत्मा म्हणतो । हाही तर्क. ॥९७३॥ बुद्धि मन देह इंद्रियगंण । इत्यादि जो जो ज्याचा गुण । तो ज्याणें प्रकाशतो तो आत्मा हे खूण । कळली तरी हा तर्क. ॥ ९७४ ॥ तो आत्मा असता वेगळा । तरी तर्कही दिसता निराळा । वाटते साक्षात्कारकळा । तो आत्मा आपणचि म्हणोनी. ॥ ९७५ ॥ परि नव्हे हा साक्षात्कार । कीं बुद्धि

न जाली तदाकार । शब्दज्ञानी हा आत्मविचार । साक्षात्कार मानिती. ॥९७६॥ एवं प्रकाशी जो जड गुण । कळली तया आत्मयाची खूण । तरी सत्त्ववृत्ति तन्मयपण । न पावे तर्कैचि तोंवरी तो. ॥ ९७७ ॥ गातां आइकतां अवतार-गुण । ध्यातां शुद्धसत्त्वमूर्ति सगुण । सत्त्ववृत्ति चिन्मयपण । पावे तेव्हां साक्षात्कार तो. ॥ ९७८ ॥ एवं मुक्तिप्रद हरी । उपासना त्याची न करी । आणि आत्मस्थिति शब्दें बोले जरी । तरी मोघज्ञान तो म्हणावा. ॥ ९७९ ॥ कर्मार्पणप्रसंग संगती । आणि ऐसेंचि भागवतीं । शुक म्हणे परिक्षितीप्रती । या श्लोकीं. ॥ ९८० ॥

भागवतश्लोक—**नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं**
न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ।
कुतः पुनः शश्वदभद्रमीश्वरे
न चार्पितं कर्म यदप्यकारणम् ॥

कर्मातीत नैष्कर्म्यज्ञान । जें अतिशयें निर्मळ निरंजन । तेंही अच्युतभक्तिहीन । न शोभे कीं न पावे साक्षात्कारातें. ॥ ९८१ ॥ तेव्हां कर्म अमंगळ । जें सर्वथा बंधक ओंगळ । तें निष्कामही नव्हे मंगळ । जें न अर्पिलें ईश्वरीं. ॥ ९८२ ॥ एवं भगवद्भक्तिहीन । म्हणावें व्यर्थचि तें ज्ञान । कीं न पावे शांति समाधान । भगवद्भक्तीवांचुनी. ॥ ९८३ ॥ आतां निर्गुणोपासक । भगवद्भक्तीवांचूनिही कित्येक । पावले ज्ञानाचा परिपाक । ते तों मोघज्ञानी न म्हणवती. ॥ ९८४ ॥ येथें शंका ऐसी मानील जरी मन । तरी त्यांस पूर्वीं होतें भगवद्भजन । सर्वथा जे भगवद्भजनहीन । प्रसंग येथें तयांचा. ॥ ९८५ ॥ राजा करी भूमिदान । तैसें भगवंतें दिधलें ज्ञान । भूदान घेऊनि सोडी राजसन्निधान । तरी प्रयत्नें पिकेलचि ते भूमी. ॥ ९८६ ॥ तैसें ज्ञान जालियावरी । सगुण भजन न लगे म्हणती परी । सगुण भजनें पूर्वींच बरी । बुद्धि जाली तयां निर्गुणोपासकांची. ॥ ९८७ ॥ सकाम आणि निष्कामही जे सर्वेश्वर । न भजती सर्वथा आणि देवता इतर । भजती आणि ज्ञानमार्गीहि चतुर । व्यर्थ तें ज्ञान त्यांचें हा अर्थ. ॥ ९८८ ॥ प्रस्तुत **'विचेतसः'** म्हणोनि । पूर्वार्धीं शेवटीं या पदें करूनी । सर्वत्र हेतु सूचवूनी । अभक्त ऐसें बोलिला. ॥ ९८९ ॥ तों अर्जुन म्हणे मनीं । यातें न भजतां अनर्थ ऐसें म्हणोनी । हींही शास्त्रें ऋषि बोलती यावरूनी । सद्बुद्धि न धरिती किमर्थ ? ॥ ९९० ॥ या शंकेचा परि-

हार । कीं नैसर्गिक ज्याचे दुष्ट संस्कार । त्याच्या कानीं हाकलती ऋषि शास्त्र-कार । तरी ते अधोमुखघटीं वृष्टि होतसे. ॥ ९९१ ॥ अनेक जन्मकर्मानुसार । दृढतर जोडला जो संस्कार । तो नैसर्गिक म्हणती शास्त्रकार । बरा हो अथवा वाईट.॥९९२॥ त्यांत उत्तम संस्कारस्थिती । त्यास म्हणती दैवी प्रकृती । अधम नैसर्गिकास म्हणती । आसुरी म्हणोनी. ॥ ९९३ ॥ तिये आसुरीचे भेद तीनी । राक्षसी आसुरी मोहिनी म्हणोनी । जे बोलिले पूर्वश्लोकें करोनी । आश्रय प्रकृ-तित्रयाचाही तयांसी. ॥ ९९४ ॥ सर्वथा हिंसाकारांची हे प्रकृती । राक्षसी प्रकृति ईस म्हणती । कीं असुरांत मनुष्य भक्षिती । तेचि म्हणावे राक्षसं. ॥ ९९५ ॥ दैत्य आणि दानव । हे असुर परि मानव । केवळ विषयासक्त भाव । बुद्धीचा तयांच्या. ॥ ९९६ ॥ 'असुर'शब्दीं अक्षरें तीनी । त्यांत 'असु' अक्षरें दोनी । 'र'कार तिसरा वेगळा करोनी । अर्थ विचारितां हा अर्थ.॥९९७॥ 'असु' म्हणिजे इंद्रियें । 'र' म्हणिजे रमणें निश्चयें । इंद्रियद्वारा विषयासक्त अत्यंत स्वयें । असुर ते भगवद्भक्तिरहित जे. ॥ ९९८ ॥ देवही विषयासक्त । परंतु सर्वेश्वराचे भक्त । क्षण न लगतां होती विरक्त । प्रतापें भगवद्भक्तीच्या. ॥ ९९९ ॥ असुर ते जे भगवद्भक्तिरहित । सर्वथा विवेकज्ञानवर्जित । म्हणोनि मोहिनीप्रकृतिसहित । तिहीं प्रकृतींचे आश्रित अभक्त ते. ॥१०००॥ भगवद्भ-क्तिवर्जित । ते भूतदयारहित । या भावें राक्षसी प्रकृतीचे आश्रित । तेचि म्हणतो श्रीकृष्ण. ॥ १००१ ॥ अन्यायें विषय सेविती । तेचि सर्वथा परपीडा करिती । म्हणोनि आसुरी प्रकृती । राक्षसी प्रकृति पुढें त्यांची बोलिली. ॥ १००२ ॥ बरें वाईट युक्तायुक्त कळे । तरी शास्त्रें सत्संगें सन्मार्गी वळे । मोहिनी प्रकृति अधिक खवळे । सांगों जातां विवेक. ॥ १००३ ॥ करावें न करावें हा विवेक । याच्या विपरीत भाव मोह अविवेक । ऐसा संस्कार नैसर्गिक । मोहिनी प्रकृति ते म्हणावी. ॥ १००४ ॥ ऐसिया तिहीं प्रकृतींचे आश्रित । भगवद्भक्तिवर्जित । मोघाशा मोघकर्में मोघज्ञानें निश्चित । त्यांचीं कीं विषयवि-क्षिप्तचित्तें म्हणोनी. ॥ १००५ ॥ पूर्वश्लोकीं म्हणे भगवंत । कीं मातें अवमा-निती मूढ अत्यंत । ते ऐसे प्रकृतित्रय आश्रित । या श्लोकीं वर्णिले '**विचेतसः**' म्हणोनी. ॥१००६॥ या तिन्ही प्रकृती । तिन्ही मिळोनी आसुरी संपत्ती । याचा विस्तार यदुपती । षोडशाध्यायांत बोलेल. ॥ १००७ ॥ तेथें म्हणेल अर्जुना ! । तूं शोक झणीं लागों देशी मना । कीं तूं दैवी संपत्तीचाच गा पांडुनंदना ! ।